


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक १ • मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ • मूल्य ५ •पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### सियाचे चार महिन्यांपूर्वीच झाले होते चेतनसोबत लग्न!

**पुणे :** पुणे : लोहगड हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांच्याबाबत एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. या दोघांनी चार महिन्यांपूर्वीच गुपचूप लग्न उरकले होते, असा दावा पोलिसांनी केला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. पोलिसांनी आरोपींच्या मोबाईलमधील व्हॉट्सअॅप चॅटची तपासणी केली असता, त्यातून मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे हा मोठा दावा करण्यात आला आहे. तपासादरम्यान सिया आणि चेतन यांनी चार महिन्यांपूर्वीच गुपचूप विवाह केला असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्या दोघांनी कुटुंबीयांपासून लपवून लग्न केलं होतं, असेही तपासात समोर आले आहे. हा विवाह केतन आणि सिया यांच्या १९ फेब्रुवारी रोजी झालेल्या साखरपुड्याच्या आसपासच झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र हे गुपचूप लग्न नेमकं साखरपुड्याच्या आधी झालं की नंतर, हे स्पष्ट झालेलं नाही.

# अकोला पालिकेत कोट्यवधींचा ‘सफाई घोटाळा’!

# 600 कामगारांच्या पैशांवर डल्ला मारण्याचा कट; 8 कोटींची बिले रोखली !

## वरिष्ठ अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले

## पीएफ आणि कामगार न्यायालयाच्या चौकशी पत्राने मनपात खळबळ

प्रतिनिधी दि. ७जुलै

**अकोला :** मनपातून संतापजनक प्रकार समोर आला आहे. मनपाच्या पडीक वॉर्डांमध्ये दैनिक स्वच्छतेच्या नावाखाली तब्बल ६०० सफाई कामगारांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारण्याचा मोठा कट उघडकीस आला आहे. हा काही लाखांचा निधी नसून कोट्यावधीचा निधी आहे. कंत्राटदार आणि मनपाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने चाललेल्या या महाघोटाळ्यामुळे मनपात एकच खळबळ उडाली असून, संशयाच्या भोवऱ्यात अडकलेल्या कंत्राटदारांचे ८ ते १० कोटी रुपयांचे देयक रोखण्यात आले आहे. हे बिल मंजूर झाल्यास पालिकेचे अनेक बडे मासे आणि वरिष्ठ अधिकारी थेट तुरुंगाच्या दारात पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या सर्व प्रकरणात कामगारांची नियुक्ती करणारी यंत्रणा मनपा आहे व आयुक्त त्याचे सर्वेसर्वा आहेत. असे असताना त्यांच्यावर या विषयीची जबाबदारी निश्चित होते.



### कागदावर ६०० कामगार गायब किती ?

» मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, महापालिकेच्या ५१ वॉर्डांमध्ये स्वच्छतेचे काम करण्यासाठी ५१ कंत्राटदार नेमण्यात आले आहेत. प्रत्येक कंत्राटदाराने १२ कामगार लावणे बंधनकारक आहे. म्हणजेच एकूण ६०० पेक्षा जास्त कामगार रोज काम करणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात हे कामगार जागेवर नसतात.पडीक वॉर्डात फक्त 'बोगस कामगार' दाखवून केवळ शासकीय तिजोरी लुटण्याचा आणि खोटी बिलं लाटण्याचा काळा धंदा सुरू होता. या सहाशे कामगारांची साधे नाव महापालिकेत नाही. इतकेच काय तर त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक खाते याचा कुठलाही तपशील नाही. त्यामुळे सहाशे कामगारांपैकी किती कामगार प्रत्यक्षात काम करत आहे असा प्रश्न उपस्थित होतो.

### ८ कोटींची बिलं अडकली; आयुक्तांवर दबाव ?

» घनकचरा व्यवस्थापनासाठी १५ व्या वित्त आयोगाकडून महापालिकेला १७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यातील माहे मे २०२५ पासूनची कंत्राटदारांची ७ महिन्यांची जवळपास ८ कोटींची देयके प्रलंबित आहेत. हा निधी कंत्राटदारांना आंदण देण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून प्रचंड हालचाली सुरू होत्या, मात्र घोटाळा उघडकीस आल्याने आणि पीएफ कार्यालय, कामगार कार्यालय तसेच ई.एस. आय.सी. कार्यालयाने थेट चौकशीचे पत्र पाठवल्यामुळे महापालिका प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. कायदेशीर कचाट्यात अडकण्याच्या भीतीने सध्या ही कोट्यावधीचे बिलं रोखून धरण्यात आली आहेत. इतकेच नाही तर महासभेच्या ठरावानंतर प्रशासनाने ठराव मंजुर केला नाही. त्याच बरोबर नव्या कंत्राटदारासाठी निविदा काढली नाही.

### भविष्यातील कंत्राटात नियम लागू

» मुळात ५१ पडीक प्रभागात एकच ठेका काढण्याची गरज होती. पण, तसे झाले नाही. वेगवेगळे ५१ कंत्राटदार नेमल्याचे दाखविले जात आहे. पण, या ५१ कंत्राटदारांचे कागदपत्रे तपासण्याची गरज आहे. इतकेच नाही तर या पुर्वी कंत्राटदाराला कामगारांच्या हक्काचे पैसे नियमानुसार संबंधित विभागाकडे टाकावे लागतील. पण,साठी खरोखर कामगार असावे लागतील. ते नसल्याने भविष्यातील टेंडर काढताना पीएफ, कामगार कल्याण निधी, इ एस आय सी चा निधी कंत्राटदाराला द्यावा लागेल असा दावा आरोग्य निरिक्षक प्रशांत राजुरकर यांनी केला आहे. महासभेने नव्याने घेतलेल्या ठरावाकडे प्रशासनाने का डोळेझाक केली याची विचारणा आता होत आहे.

### आरोग्य निरीक्षकांचा 'जिओटॅग'चा दावा फोल?

» या संपूर्ण प्रकरणावर आरोग्य निरीक्षक प्रशांत राजुरकर यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. 'एकही कामगार गैरहजर असला तर आम्हाला जिओटॅग असलेले फोटो मिळतात आणि आम्ही ५०० रुपये प्रति कामगार दंड करतो,' असा दावा त्यांनी केला. मात्र, 'नेमके किती कामगार गैरहजर होते आणि किती दंड ठोकला?' याची कोणतीही ठोस आकडेवारी राजुरकर यांना देता आली नाही. प्रशासक राज नंतरमहासभेने ठराव घेतल्यानंतर जुनेच ठेकेदार कार्यरत असल्याचा अफलातून दावा आरोग्य निरिक्षकांनी केला आहे. म्हणजे त्यांनी महासभेच्या ठरावाकडे प्रशासनाने दूर्लक्ष केल्याचे चित्र आहे. गरिबांच्या हक्काच्या ८ कोटींवर डल्ला मारू पाहणाऱ्या त्या ५१ कंत्राटदारांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या महापालिकेच्या 'त्या' बड्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार का ? अशी विचारणा आता होत आहे.

### हक्काचा पैसा वळता केला नसल्याची माहिती

» या घोटाळ्याची व्याप्ती एवढी मोठी आहे की, कामगारांचा भविष्य निर्वाह निधी (इइ), कामगार कल्याण निधी आणि ई.एस. आय.सी. (Eएघ्ण्) चा कोट्यवधी रुपयांचा हक्काचा निधी संबंधित विभागांकडे जमाच करण्यात आलेला नाही. कामगारांच्या हक्काचा पैसा थेट कंत्राटदारांच्या घशात घालण्याची पूर्ण तयारी झाली होती. कामगार नियुक्त केले नाही, प्रत्यक्षात कामगार नाहीच. त्यामुळे नुसते कंत्राटदारच नाही तर महापालिकेचे अधिकारी देखील या सर्व प्रकरणात अडचणीत सापडणार आहे.

# शरद पवार गट भाजपासोबत जाणार?

प्रतिनिधी दि. ७जुलै

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'मुळे महाराष्ट्राच्या राजकारणात उडालेली खळबळ शांत होत असतानाच आता राजकीय वर्तुळात आणखी एक महत्त्वाची घडामोड घडण्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजपचे वरिष्ठ नेते विनोद तावडे या दोघांची मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महायुतीत सहभागी झाल्यास पक्षाच्या वाट्याला काय येऊ शकतं? याबाबत चर्चा झाल्याचे समजते. विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्यात चर्चा पार पडल्यानंतर जयंत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक वरिष्ठ नेता यांच्यातदेखील बैठक पार पडल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सत्तेत येत असल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नेमकी भूमिका काय? असणार याबाबत चर्चा झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. जयंत पाटील यांना संपर्क साधला असता त्यांनी विनोद तावडे यांच्याशी भेट झाल्याच मान्य केले. मात्र, बैठकीत अनौपचारिक चर्चा पार पडल्याची माहिती त्यांनी दिली. अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा होती. दोन्ही पवारांचे पक्ष एकत्र आले असते तर ते एनडीए सोबत राहिले असते की इंडिया सोबत? हा प्रश्न अजित दादांच्या अपघाती निधनामुळे कायमचा अनुत्तरित राहिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) गटाचे ९ आमदार व ८ खासदार आहेत.

> अशी फक्त चर्चा आहे. यात कोणतंही तथ्य नाही. केंद्रात किंवा कोणत्याही नेत्यांबरोबर अशी चर्चा सुरू नाही. विरोधातील सक्षम पक्ष म्हणून, पवारांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाविरोधात लढणारा पक्ष म्हणून महाराष्ट्र धर्माची भूमिका आम्ही मांडत आहोत
>
> – रोहित पवार, आमदार

# अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने मदत - महसूल मंत्री

प्रतिनिधी दि. ७जुलै

**नागपूर :** राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. कोणताही नुकसानग्रस्त मदतीपासून वंचित राहणार नाही, मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार नुकसानग्रस्तांना तातडीने मदत केली जाणार असून याची महसूल विभाग दक्षता घेईल, असा दावा महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. मंगळवारी नागपुरात ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेतला. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे तसेच संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जीवितहानी, वित्तहानी आणि इतर नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. महसूल विभागाच्या माध्यमातून नुकसानग्रस्तांचे सर्वेक्षण पारदर्शक व अचूक पद्धतीने केले जाईल. कोणताही पात्र लाभार्थी नुकसान भरपाईपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल. तसेच एनडीआरएफ व एसडीआरएफच्या निकषांनुसार घरांची पडझड, खावटी आणि इतर तातडीच्या मदतीचे अनुदान २४ तासांच्या आत देण्याची तरतूद असून त्यानुसार शासन कार्यवाही करत असल्याचे त्यांनी सांगितले.



# राजभवनात जवानाने सर्व्हिस रिव्हॉल्वरने केली आत्महत्या

प्रतिनिधी दि. ७जुलै

**मुंबई :** मुंबईतील मलबार हिल येथील राजभवनात एक अत्यंत दुःखद घटना घडली आहे. राज्यपालांच्या निवासस्थानाच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) एका जवानाने कर्तव्यावर असताना स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

ही घटना राजभवन परिसरातील लोक भवन कॅम्पमध्ये पहाटे १:०० वाजण्याच्या सुमारास घडली.

मृत जवानाची ओळख २६ वर्षीय कौस्तुभ सांगळे, पोलीस हवालदार (अनमलदार) अशी पटली आहे. कौस्तुभ मूळचा नाशिकचा असून तो कोल्हापूर येथील एसआरपीएफच्या ग्रुप १६ तुकडीत कार्यरत होता. राजभवनाची सुरक्षा राखण्यासाठी त्याची नुकतीच नियुक्ती करण्यात आली होती.

# विदर्भात पाऊस पुन्हा धुमाकूळ घालणार!

## 48 तासांत जोरदार पावसाची एन्ट्री

प्रतिनिधी दि. ७जुलै



**नागपूर :** विदर्भातील काही भागांत पुढील ४८ ते ७२ तासांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. नागपूर, अकोला, अमरावतीसह अनेक जिल्ह्यांत चांगल्या पावसाचा अंदाज नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दक्षिणेकडील भागात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम विदर्भावर होत असून त्याच्या प्रभावामुळे पावसाच्या सरी तीव्र होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवस विदर्भातील वातावरण पावसासाठी अनुकूल राहणार आहे. विशेषतः गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

काही ठिकाणी १०० मिलिमीटर किंवा त्यापेक्षा अधिक पावसाची नोंद होऊ शकते. तसेच नागपूर, अकोला, अमरावती आणि परिसरातील जिल्ह्यांमध्येही मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून विदर्भात पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली, तरी आता पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. शेतीच्या दृष्टीने हा पाऊस लाभदायक ठरण्याची शक्यता असून, अतिवृष्टी होणाऱ्या भागांमध्ये मात्र खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

# राम जन्मभूमी ट्रस्टचा कारभार शेगाव संस्थानकडे सोपवा!

## माजी मंत्री सुबोध सावजी यांचे राष्ट्रपतींना पत्र

प्रतिनिधी दि. ७जुलै

**बुलडाणा :** अयोध्येतील राम मंदिरामधील दानासंदर्भातील अपहार प्रकरणात रोज नवे खुलासे होत असतानाच महाराष्ट्रातील एका माजी मंत्र्याने थेट देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहिलं आहे. या पत्रामध्ये अयोध्येतील राम मंदिराचा कारभार पाहणाऱ्या श्री राम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टचा कारभार शेगावच्या गजानन महाराज संस्थानाकडे सोपवण्याची मागणी केली आहे.

गजानन महाराज संस्थान किंवा भारतीय लष्कराकडे श्री राम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्ट कारभार सोपावावा, अशी मागणी सुबोध सावजी यांनी केली आहे. राम मंदिराच्या देणग्यांच्या गैरव्यवहारा संदर्भातील आरोपांमुळे आपण ही मागणी करत असल्याचे सुबोध सावजी यांनी पत्रात नमूद केले आहे. ट्रस्टचा कारभार विश्वासार्ह संस्थेकडे द्यावा, जेणेकरून पारदर्शकता राहील, असे म्हणत सावजी यांनी शेगावच्या गजानन महाराज संस्थानाचे आणि भारतीय लष्कराचे नाव सुचवलं आहे. या पत्रामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मागील काही दिवसांपासून राम मंदिर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावरही गजानन महाराज




संस्थानाच्या स्वच्छ कारभाराची चांगलीच चर्चा दिसत आहे. सोशल मीडियावरील या चर्चेप्रमाणेच सावजी यांनी थेट राष्ट्रपतींना अशी मागणी करणारे पत्र लिहिल्याने गल्ली ते दिल्लीपर्यंत याची चर्चा होताना दिसतेय. सुबोध सावजी हे विदर्भातील (बुलढाणा जिल्हा) काँग्रेस पक्षाचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते आहेत. राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार होते तेव्हा महाराष्ट्र सरकारमध्ये त्यांनी मंत्री पद भूषवले आहे. त्यावेळी ते बुलढाणा जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांपैकी एक होते. राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने सोमवारी महासचिव चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांचे राजीनामे स्वीकारले. देणगी अपहार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी झालेल्या तीन तासांच्या बैठकीत ट्रस्टने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, विश्वस्त कृष्ण मोहन यांच्याकडे अंतरिम महासचिवपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ट्रस्टसाठी स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) नियुक्त करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

# कळसूबाई, सांदन व्हॅलीसह प्रमुख पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी बंद!

## भंडाऱ्यात निसर्गाचं तांडव; २४ तासांत ३०० मिमी पाऊस

प्रतिनिधी दि. ७ जुलै

अहिल्यानगर : पावसाचा वाढता जोर पाहता भंडारदरा धरण परिसरातील सर्व धोकादायक पर्यटनस्थळे तत्काळ बंद करण्यात आली आहेत. कळसूबाई शिखर, ट्रेकर्सचे नंदनवन मानली जाणारी सांदन व्हॅली, रतनवाडी आणि परिसरातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांवर पर्यटकांना जाण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. तसेच, ओसंडून वाहणाऱ्या धबधब्यांच्या खाली जाण्यास प्रशासनाने पर्यटकांना सक्त मनाई केली आहे.




अहिल्यानगर जिल्ह्यासह नाशिक जिल्ह्याला पावसाने झोडपून काढले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रसिद्ध भंडारदरा धरण परिसरात गेल्या २४ तासांत पावसाने अक्षरश: तांडव घातले असून, येथे तब्बल ३०० मिलीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. विशेषत: घाटमाथ्यावरील घाटघर आणि रतनवाडी परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने स्थानिक नदी-नाल्यांना पूर आला आहे. घाटघर आणि रतनवाडी परिसरातील अतिवृष्टीमुळे या दुर्गम आदिवासी भागातील जनजीवन पूर्णपणे प्रभावित झाले आहे. सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसामुळे अनेक गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या

### इगतपुरीत २०० मिमी

» नाशिक जिल्ह्यातही मान्सूनचा जोर कायम आहे. जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात सर्वाधिक २०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर इतर तालुक्यांमध्येही मुसळधार पाऊस कोसळत आहे. सतत होत असलेल्या या मुसळधार पावसामुळे नाशिक आणि अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाचे संपूर्ण परिस्थितीवर बारीक लक्ष असून, नागरिकांना आणि पर्यटकांना सुरक्षित स्थळी राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भूत, भानामती आणि जादूटोणा

## भीतीचा इतिहास की विज्ञानाने उलगडलेले वास्तव.?



'माणूस भुताला घाबरतो, पण खरे तर तो स्वतःच्या अज्ञानाला घाबरत असतो.' मानवी संस्कृतीच्या इतिहासात काही प्रश्न असे आहेत की जे हजारो वर्षांपासून मानवाला सतावत आहेत. 'मी कोण?', 'मृत्यूनंतर काय?', 'आत्मा आहे का?', 'भूत असते का?' हे प्रश्न आजही अनुत्तरित असल्याचे अनेकांना वाटते. विज्ञानाने अनेक रहस्यांवर प्रकाश टाकला असला तरी भूत, प्रेत, पिशाच, भानामती, जादूटोणा आणि करणी या संकल्पना आजही समाजाच्या एका मोठ्या घटकाच्या मनात खोलवर रुजलेल्या आहेत. आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह, अंतराळ मोहिमा, जनुकीय अभियांत्रिकी आणि क्वांटम संगणकाच्या युगात जगत आहोत; परंतु त्याच समाजात एखाद्या झाडाखाली सावली दिसली, रात्री विचित्र आवाज ऐकू आला, एखाद्याला मानसिक आजार झाला किंवा सलग दुर्दैवी घटना घडल्या की 'भूत लागले', 'करणी झाली', 'भानामती झाली' असे निष्कर्ष काढले जातात. हा विरोधाभास चिंताजनक आहे.

भुताची कल्पना कोणत्या एका व्यक्तीने निर्माण केली नाही. मानवाने जेव्हा प्रथम मृत्यू अनुभवला, तेव्हा त्याच्या मनात मृत्यूनंतरच्या अस्तित्वाबद्दल प्रश्न निर्माण झाले. मृत व्यक्ती स्वप्नात दिसणे, त्यांच्या आठवणी मनात राहणे, अंधारातील अज्ञात भीती आणि निसर्गातील अनाकलनीय घटना यांमधून आत्मा आणि भुताच्या कल्पना आकाराला आल्या. प्राचीन काळात वीज, वैद्यकशास्त्र, भौतिकशास्त्र किंवा जीवशास्त्र यांचे ज्ञान नव्हते. महामारी का येते, ग्रहण का लागते, वीज का चमकते, भूकंप का होतो, याचे उत्तर लोकांकडे नव्हते. त्यामुळे अदृश्य शक्तींची कल्पना करणे ही मानवी मेंदूची नैसर्गिक प्रतिक्रिया होती. अशाच प्रकारे देव, देवता, दैत्य, राक्षस आणि भुते यांचे सांस्कृतिक विश्व निर्माण झाले.

परंतु विज्ञानाचा प्रवास सुरू झाल्यानंतर प्रत्येक दाव्याकडे पुराव्याच्या आधारे पाहण्याची पद्धत विकसित झाली. आजपर्यंत जगभरातील कोणत्याही प्रतिष्ठित वैज्ञानिक संस्थेने 'भूत' हा स्वतंत्र अस्तित्व असलेला घटक असल्याचे सिद्ध केलेले नाही. अनेक कथित भुताटकीच्या जागांची तपासणी करण्यात आली. ज्या घटना अलौकिक वाटत होत्या त्यामागे नैसर्गिक कारणे, प्रकाशाचे अपवर्तन, ध्वनीचे परावर्तन, विद्युतचुंबकीय परिणाम, विषारी वायू, बुरशीचा परिणाम, मानसिक ताण किंवा मानवी फसवणूक असल्याचे अनेकदा आढळले. मानसशास्त्र सांगते की मानवी मेंदू हा अर्थ शोधणारा अवयव आहे. जिथे माहिती अपुरी असते, तिथे तो कल्पनेनी रिकामी जागा भरतो. म्हणूनच अंधारात दोरी साप वाटते, सावली माणूस वाटते, आवाज कुजबुज वाटतो. यालाच संज्ञानात्मक भ्रम म्हणतात. झोपेच्या विशिष्ट अवस्थेत होणारा 'स्लीप पॅरॅलिसिस', काही मानसिक आजार, तीव्र ताण, नैराश्य, शोक, एकटेपणा किंवा काही औषधांचे दुष्परिणाम यांमुळे अनेकांना प्रत्यक्ष नसलेल्या व्यक्तीचा भास होऊ शकतो. अशा अनुभवांना पूर्वी भूत समजले जात असे; आज वैद्यकीय विज्ञान त्यांचे स्पष्टीकरण देते.

भानामती, करणी आणि जादूटोणा यांची सामाजिक विश्लेषण आवश्यक आहे. भारतातील अनेक ग्रामीण भागांत आजही आजार, अपघात, शेतीचे नुकसान किंवा कौटुंबिक संकट यामागे करणी असल्याचा समज आढळतो. या भीतीचा फायदा घेऊन काही तथाकथित मांत्रिक, तांत्रिक आणि भोंदू लोक आर्थिक, मानसिक आणि सामाजिक शोषण करतात. काही वेळा निरपराध महिलांना 'चेटकीण' ठरवून त्यांच्यावर अमानुष अत्याचार केले जातात. हे केवळ अंधश्रद्धेचे नव्हे, तर मानवी हक्कांचेही गंभीर उल्लंघन आहे. याउलट, विज्ञान कोणताही दावा नाकारत नाही; परंतु तो स्वीकारण्यापूर्वी पडताळणीची मागणी करतो. उद्या जर भुताच्या अस्तित्वाचा पुनरावृत्ती करता येईल असा ठोस, स्वतंत्र आणि वैज्ञानिक पुरावा मिळाला, तर विज्ञान त्याचाही अभ्यास करेल. विज्ञानाचे सामर्थ्य हे बदल स्वीकारण्यात आहे, आंधळ्या नकारात नाही. मात्र आजपर्यंत असा पुरावा उपलब्ध नाही. भुतांच्या कथा मात्र समाजात का टिकून आहेत? कारण त्या केवळ भीतीच्या कथा नाहीत. त्या संस्कृतीचा भाग आहेत. लोककथा, कीर्तन, नाटक, कादंबऱ्या, चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांनी या कल्पनांना अधिक लोकप्रिय केले. मनोरंजन आणि वास्तव यातील सीमा अनेकदा धूसर होते.आजची सर्वात मोठी गरज म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे श्रद्धेचा अपमान नव्हे, तर प्रश्न विचारण्याचे धैर्य. एखादी घटना घडली तर तिचे कारण शोधणे, पुरावे तपासणे, विविध शक्यता पडताळणे आणि त्यानंतर निष्कर्ष काढणे हीच वैज्ञानिक वृत्ती आहे. भारतीय राज्यघटनेत नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि चिकित्सक वृत्ती विकसित करावी, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. कारण अंधश्रद्धा समाजाला भयभीत करते; तर विज्ञान समाजाला सक्षम बनवते.आज आपल्या समाजात खरी भुते जर असतील, तर ती अज्ञान, गरिबी, अशिक्षण, अफवा, अंधविश्वास, जातीय द्वेष, अंधानुकरण आणि शोषण ही आहेत. ही भुते माणसाचे आयुष्य उद्ध्वस्त करतात. त्यांच्याशी लढण्यासाठी कोणत्याही ताईताची किंवा झाडफुकीची गरज नाही; गरज आहे शिक्षणाची, वैज्ञानिक विचारांची, संवेदनशीलतेची आणि विवेकाची. भुतांच्या कथा ऐकण्यात हरकत नाही; त्या लोकसाहित्याचा भाग आहेत. पण त्या वास्तव समजून निर्णय घेणे धोकादायक आहे. आजारावर डॉक्टर, मानसिक समस्येवर मानसोपचारतज्ज्ञ, सामाजिक समस्येवर कायदा आणि नैसर्गिक घटनांवर विज्ञान हेच योग्य उत्तर आहे. शेवटी एवढेच आजवर उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक पुराव्यानुसार भुतांचे अस्तित्व सिद्ध झालेले नाही. मात्र भुतांवरील विश्वास हा मानवी इतिहास, मानसशास्त्र, संस्कृती आणि भीती यांचा परिणाम आहे. म्हणून अंधारातील सावल्यांना भूत समजण्यापेक्षा ज्ञानाचा दिवा पेटवणे अधिक आवश्यक आहे. विवेक हा भीतीचा सर्वात मोठा पराभव करतो, आणि विज्ञान हा अंधश्रद्धेवरचा सर्वात प्रभावी प्रकाश आहे. समाजाचे भविष्य भुतांच्या भीतीत नाही, तर प्रश्न विचारणाऱ्या, पुरावा शोधणाऱ्या आणि सत्य स्वीकारणाऱ्या पिढीत आहे.

गजानन हरणे
खडकी ,अकोला .
संवाद : ९८२२९४२६२३.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

# केवळ दिलासा नव्हे, कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा

महाराष्ट्रातील शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत हवामानातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि नैसर्गिक आपत्ती यांच्या कात्रीत शेतकरी अडकला आहे. अशा वेळी शासनाकडून जाहीर होणाऱ्या कर्जमुक्ती योजना केवळ आर्थिक मदतीच्या चौकटीत पाहता येत नाहीत; त्या शेतकऱ्याच्या मनातील विश्वास पुन्हा जागविण्याचा प्रयत्न असतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे.

कर्जमाफी हा शब्द अनेकदा चर्चेचा विषय ठरतो. मात्र, कर्जमुक्तीचा खरा अर्थ केवळ थकबाकी कमी करणे एवढाच नसतो. त्यामागे शेतकऱ्याला नव्याने उभे करण्याचा व्यापक उद्देश असतो. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याची निर्णयक्षमता मर्यादित होते. पुढील हंगामासाठी दर्जेदार बियाणे घेण्यापासून ते आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर आर्थिक मर्यादा त्याच्या आड येतात. अशा वेळी कर्जमुक्ती म्हणजे केवळ दिलासा नसून नव्याने सुरुवात करण्याची संधी असते.

या योजनेचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे संस्थात्मक पतव्यवस्थेवर शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ होण्याची शक्यता. बँका आणि सहकारी संस्थांकडून वेळेवर कर्ज उपलब्ध होणे हे शेतीच्या सातत्यासाठी अत्यावश्यक असते. कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यांची पत सुधारल्यास त्यांना भविष्यात आवश्यक आर्थिक मदत अधिक सहज मिळू शकते. यामुळे खासगी सावकारांवरील अवलंबित्व कमी होण्यास हातभार लागतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतही नव्या आर्थिक चक्राला चालना मिळण्याची शक्यता निर्माण होते.

या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले आहे, यालाही विशेष अर्थ आहे. लोककल्याण, न्याय, पारदर्शकता आणि विकासाभिमुख प्रशासन यांचा आदर्श त्यांनी आपल्या राज्यकारभारातून घालून दिला. त्यांच्या नावाने सुरू झालेली योजना ही शेतकरी कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या शासनाच्या भूमिकेचे प्रतीक म्हणून पाहता येईल.अर्थात, कोणतीही कर्जमुक्ती योजना ही कृषी क्षेत्रातील सर्व समस्यांवरील अंतिम उत्तर ठरू शकत नाही. तिच्या जोडीला सिंचन व्यवस्थेचा विस्तार, पीक विम्याची प्रभावी अंमलबजावणी, साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, मूल्यवर्धन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार या उपाययोजनाही तितक्याच आवश्यक आहेत. त्यासाठीही राज्य शासनाने अनेक योजना लागू केल्या आहेत, अर्थात सर्व सुधारणांची सुरुवात शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यापासूनच होते आणि त्यासाठी कर्जमुक्ती हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

या योजनेत व्यापक प्रमाणावर शेतकरी बांधवांना लाभ होण्यासाठी २ लाखांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जदारांना प्रोत्साहन -५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ, एकवेळ समझोत्याची तरतूद अशा बाबींचा समावेश आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी जमीन धारणेची कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही. योजनेसाठी कोणताही स्वतंत्र अर्ज भरण्याची गरज नाही. केवळ आधार प्रमाणीकरण करावे लागते. योजनेच्या पारदर्शक, वेगवान आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पातळीवर वेगाने प्रयत्न होत आहेत. अकोला जिल्ह्यात जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून २९ हजारहून अधिक शेतक-यांची खाती अपलोड करण्यात आली आहेत. शेतकरी सक्षम असेल, तर शेती सक्षम होईल; शेती सक्षम झाली, तर ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल; आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली, तर महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळेल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही त्या दिशेने टाकलेले आश्वासक आणि दूरदृष्टीचे पाऊल आहे. ही केवळ कर्जमाफी म्हणून नव्हे, तर ती कृषी पुनरुत्थानाच्या व्यापक प्रक्रियेची प्रभावी सुरुवात आहे.

हर्षवर्धन पवार
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

# मुक्त विद्यापीठाची वाटचाल खाजगीकरणाकडे?

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे महाराष्ट्र शासनाचे एक सार्वजनिक विद्यापीठ आहे ,जे प्रामुख्याने नियमित महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेऊ शकत नाहीत ,अशा विद्यार्थ्यांसाठी स्थापन केले. मागील दोन वर्षांपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने विविध खाजगी संस्थांशी सामंजस्य करार करून त्यांच्या साह्याने विविध तंत्रज्ञान अभ्यासक्रम व कौशल्यपूर्ण? ? मनुष्यबळ निर्मितीसाठी अभ्यासक्रम सुरू केले आहेत किंवा तसे सामंजस्य करार करण्याचा धडाका लावला आहे. त्यात प्रामुख्याने ऑलकार्गो लॉजिस्टिक लिमिटेड, मुंबई;डीव्ही एव्हिएशन, मुंबई;स्वजन विद्यार्थी प्रायव्हेट लिमिटेड; बीव्हीजी इंडिया लिमिटेड; फिजिक्सवाला ,न्यू दिल्ली; जॅग्वार्स डिफेन्स अकॅडमी नाशिक;भक्तीवेदांता रिसर्च सेंटर, कोलकाता;विवस्वत रिव्होल्यूशन्स लिमिटेड मुंबई;डॉट इनकॉर्पोरेशन, साऊथ कोरिया;ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था ,पुणे;कोर एलपीपी पावर हाऊस ,पुणे

महायान ग्लोबल इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक; जेएनपीटी विदावन (वधवन) पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड, मुंबई; स्किल फॅक्टरी लर्निंग प्रायव्हेट लिमिटेड, पुणे; आद्यम योग संस्था, पुणे; डिस्कवर वेलनेस प्रायव्हेट लिमिटेड ,पुणे;आरोव एज्युकेशनल अँड एम्प्लॉयमेंट रिसर्च ऑर्गनायझेशन, पुणे;नपाते इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थकेअर एज्युकेशन, पुणे अशा खाजगी संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. यातील जास्तीत जास्त संस्था या पुण्यातून आहे. त्यामुळे असे सामंजस्य करार पुण्यातूनच का हा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो. बाकीच्या संस्था जवळपास मुंबई व नाशिकच्या आहेत. मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विशेष करून ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना याचा कितपत फायदा होईल, हे सांगणे कठीण आहे.



मुक्त विद्यापीठाने प्रत्येक अभ्यासक्रम चालविण्यासाठी फक्त एकाच खाजगी संस्थेशी (सोयीच्या? )सामंजस्य करार केल्याने,तोच अभ्यासक्रम चालवणाऱ्या इतर खाजगी शैक्षणिक संस्थांना समान संधी नाकारण्यात आली आहे,जे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ (समानतेचा हक्क) चे उल्लंघन करते.ङ जसे विमानन (एव्हिएशन) संबंधित अभ्यासक्रमांसाठी फक्त डीव्ही एव्हिएशन, मुंबई, यांच्याशीच सामंजस्य करार केला.सन २०२६ पर्यंत, नागरी हवाई वाहतूक मंत्रालय आणि नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) यांनी भारतात कार्यरत असलेल्या ४० सक्रिय उड्डाण प्रशिक्षण संस्थांना अधिकृतपणे मान्यता दिली आहे. त्यात डीव्ही एव्हिएशन, मुंबई ही नाही. येथे प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की डीव्ही एव्हिएशन यांना एव्हीएलपी चाचणी केंद्र म्हणजे पायलट आणि विमान वाहतूक नियंत्रण (एटीसी) अधिकाऱ्यांची विमान उड्डाणाची संबंधित इंग्रजी भाषा बोलण्याची आणि समजून घेण्याची क्षमता तपासण्याचे अधिकृत केंद्र म्हणून नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची मान्यता प्राप्त असली तरी प्रत्यक्ष उड्डाण तासांसाठी एक स्वतंत्र स्वयंपूर्ण फ्लाईंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशन (एफटीओ) म्हणून त्याची नोंद नाही. त्यामुळे ते विद्यार्थांना व्यावसायिक वैमानिक परवाना देऊच शकत नाही. त्यामुळे त्यासाठी येथे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना वैमानिक परवाना मिळविण्यासाठी परत दुसऱ्या मान्यता प्राप्त उड्डाण प्रशिक्षण संस्थेमध्ये जावे लागते. मग प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो की मुक्त विद्यापीठाने डीव्ही एव्हिएशनसोबतच सामंजस्य करार का केला? त्यामुळे साहजिकच असा संशय निर्माण होतो की, कोणत्या स्वार्थापोटी तर हे केले नाही ना? येथे प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की विद्यापीठ अनुदान आयोगची,देशातील मुक्त विद्यापीठांना, अभियांत्रिकी, मेडिकल, कृषी, हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी, एअरक्राफ्ट मेंटेनन्स, विमानन(एव्हिएशन) इत्यादी संबंधित पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविण्यासाठी परवानगी नाही. मुक्त विद्यापीठे फक्त यासंबंधी डिप्लोमा व सर्टिफिकेट कोर्सेस चालवू शकतात.

मुक्त' विद्यापीठ हे 'स्व-अर्थसहाय्यित' (सेल्फ फायनान्सिंग) विद्यापीठ आहे जे आपला परिचालन (ऑपरेटिंग) खर्च थेट सरकारी अनुदानाऐवजी विद्यार्थ्यांच्या शुल्कातून भागवतात. त्यामुळे त्यांचा निधी सार्वजनिक निधी मानला जातो व त्याचे कार्यकारी अधिकारी सार्वजनिक सेवक आहेत. विद्यापीठाला सार्वजनिक उत्तरदायित्वाच्या मानकांचे पालन करणे आवश्यक आहे.त्यामुळे मुक्त विद्यापीठ महाराष्ट्र खरेदी धोरण आणि सामान्य वित्तीय नियमांशी (जीएफआर) कायदेशीररित्या बांधील आहे.पण मुक्त विद्यापीठाने विविध खाजगी शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार हे स्पर्धात्मक प्रक्रियेशिवाय केले आहेत.

महाराष्ट्रात खाजगी शैक्षणिक संस्था या कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्मितीसाठी विविध अभ्यासक्रम चालवितात. त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमांचे प्रमाणीकरण (सर्टिफिकेशन) सार्वजनिक विद्यापीठाने केले तर निश्चितच त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमांचे वजन वाढते. सार्वजनिक विद्यापीठाचे नाव पाहून, खाजगी संस्थेत विद्यार्थी येण्याचा ओघ वाढतो.

खाजगी शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने मुक्त विद्यापीठ जे विविध अभ्यासक्रम चालवितात त्याच्या शैक्षणिक शुल्काचा मोठा हिस्सा हा खाजगी संस्थांना,तर उर्वरित हिस्सा मुक्त विद्यापीठाला मिळतो. जसे मुक्त विद्यापीठाने असाच 'सायबर सिक्युरिटी 'चा अभ्यासक्रम खाजगी संस्थेशी करार करून मुक्त विद्यापीठातील सर्वच विद्यार्थ्यांना अनिवार्य केला आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ७० टक्के हिस्सा या खाजगी संस्थेला व उर्वरित ३० टक्के मुक्त विद्यापीठाला मिळतो.त्यामुळे याला सेवांचे व्यावसायिक आउटसोर्सिंग म्हणून गणले जाईल.त्यामुळे मुक्त विद्यापीठाने सामंजस्य करार करताना प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या आवश्यक पायाभूत व इतर सुविधा, आणि शैक्षणिक कामगिरीचा तपशील देणाऱ्या प्रस्तावासाठी विनंती (रिक्वेस्ट फॉर प्रपोजल) किंवा स्वारस्य अभिव्यक्ती (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) मागितली पाहिजे होती. तशी जाहिरात केली पाहिजे. असे केल्याने पात्र आणि इच्छुक संस्थांमध्ये स्पर्धा निर्माण होते. यामुळे विद्यापीठाला सर्वोत्तम सेवा देणारे भागीदार निवडणे शक्य होते. अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष आणि इतर भौतिक सुविधांची पूर्तता संस्था करत आहे किंवा नाही, हे सार्वजनिक प्रस्तावाच्या माध्यमातून आधीच तपासता येते.संस्थेचा आधीचा कामाचा अनुभव, निकालाची टक्केवारी आणि शैक्षणिक दर्जा या निकषांवर संस्थेचे मूल्यमापन करता येते. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळू शकते. खाजगी संस्थांशी सामंजस्य करार करताना मुक्त विद्यापीठाने एका पारदर्शक गुणांकन प्रणालीच्या आधारे खाजगी संस्थांची निवड करायला पाहिजे होती. ही कायदेशीर प्रक्रिया मुक्त विद्यापीठाने पाळलीच नाही. जिथे आर्थिक व्यवहार आहे तेथे सामंजस्य करार मनमानी खाजगी वाटाघाटीद्वारे केला जाऊ शकत नाही. पण मुक्त विद्यापीठाने सामंजस्य करार हे मनमानी पद्धतीने केले.

खाजगी संस्थांच्या सहकार्याने चालवल्या जाणाऱ्या बहुतांश अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक देखरेखीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्राध्यापक/तज्ज्ञ सदस्य उपलब्ध नाही. त्यामुळे खाजगी संस्थेद्वारे केले जात असलेल्या सर्व शैक्षणिक कामकाजाची देखरेख व मुल्यांकन कोण करेल? मग काय मुक्त विद्यापीठ केवळ परीक्षा घेणे व गुण प्रदान करणे एवढीच जबाबदारी पार पाडेल? मग अशा खाजगी संस्थांच्या सहकार्याने चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते.

महाराष्ट्रात शिक्षणाचे व्यापारीकरण रोखण्यासाठी, आर्थिक पारदर्शकता सुरक्षित करण्यासाठी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांचा शुल्क रचनेचे नियमन करण्यासाठी, महाराष्ट्रात शुल्क नियामक प्राधिकरण (फी रेग्युलेटिंग ऑथोरिटी, एफआरए) स्थापन करण्यात आली आहे, जे उच्च शिक्षणातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांच्या शुल्क रचनेचे नियमन आणि मंजुरी देते.

आज मुक्त विद्यापीठ खाजगी संस्थांशी सामंजस्य करार करून विविध व्यावसायिक अभ्यासक्रम चालवितात.शैक्षणिक शुल्काचा मोठा हिस्सा खाजगी संस्थेला जात असल्याने अशा ङअभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कांचे नियमन शुल्क नियामक प्राधिकरणाने करणे आवश्यक आहे. अन्यथा खाजगी संस्था ज्यांचा मुख्य उद्देश हा पैसे कमविणे असल्याने व सामंजस्य करार केलेले बहुतांश अभ्यासक्रम हे व्यावसायिक असल्याने,ते मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून अव्वाच्यासव्वा शैक्षणिक शुल्क घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच या अभ्यासक्रमांसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना/ आर्थिकदृष्ट्या मागास वर्गांना दिल्या जाणारी शिष्यवृत्ती ही शासनाला द्यावी लागत असल्याने, यावर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

मुक्त विद्यापीठामध्ये विविध पार्श्वभूमीचे विद्यार्थी शिक्षण घेत असले तरी, त्यातील बहुसंख्य विद्यार्थी कमी उत्पन्न असलेल्या, ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतून येतात. हे विद्यापीठ एक 'मास युनिव्हर्सिटी' म्हणून काम करते, जे नोकरी करणारे प्रौढ, शेतकरी आणि पारंपरिक व पूर्ण-वेळ महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊ न शकणाऱ्यांसाठी अत्यंत परवडणारे आणि लवचिक मुक्त-शिक्षणाचे पर्याय उपलब्ध करून देते.अशा पार्श्वभूमीवर ङअसे खाजगी संस्थांना फायदा करून देणारे शैक्षणिक करार मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना परवडणारे नसल्याची दाट शक्यता आहे.ज्या मुक्त विद्यापीठाचा मूळ उद्देश लोक विद्यापीठ होण्याचा आहे, त्याची वाटचाल ही खाजगीकरणाकडे तर जात नाही ना..

प्रा.डॉ. संजय त्रिंबकराव खडक्कार
माजी तज्ज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ.
मो.७२७६६१४२६०

# चित्रपटांमध्ये मेथड ॲक्टिंगची सुरुवात करणारे अभिनेता दिलीप कुमार !

मुहम्मद युसूफ खान हे दिलीपकुमार नावाने प्रसिद्ध असून त्यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ मध्ये पेशावर, वायव्य सरहद्द प्रांत (आता खैबर पख्तुनख्वा , पाकिस्तान) येथे झाला. तर त्यांचा मृत्यू ७ जुलै २०२१ मध्ये मुंबई , महाराष्ट्र येथे झाला. मुहम्मद युसूफ खान हे व्यावसायिकरित्या दिलीप कुमार म्हणून ओळखले जाणारे, एक भारतीय अभिनेते, लेखक आणि चित्रपट निर्माते होते, जे प्रामुख्याने हिंदी चित्रपटसृष्टीतील त्यांच्या कामासाठी ओळखले जातात . चित्रपटांमध्ये मेथड ॲक्टिंगची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. त्यांनी १९५० च्या दशकापासून १९६० च्या दशकापर्यंत हिंदी चित्रपटसृष्टीवर वर्चस्व गाजवले आणि भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील महान अभिनेत्यांपैकी एक म्हणून त्यांची मोठ्या प्रमाणावर गणना केली जाते.



पाच दशकांहून अधिक काळ चाललेल्या कारकिर्दीत, कुमार यांनी ५७ चित्रपटांमध्ये काम केले. त्यांनी बॉम्बे टॉकीज निर्मित 'ज्वार भाटा' (१९४४) या चित्रपटातून अभिनेता म्हणून पदार्पण केले . अनेक अयशस्वी चित्रपटांनंतर, 'जुगनू' (१९४७) हा त्यांचा पहिला बॉक्स ऑफिस हिट ठरला. १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून ते १९६० च्या दशकापर्यंत त्यांनी 'शहीद' , 'अंदाज ', ' बाबुल ' , ' दीदार' , 'आन' , ' उरण खटोला' , 'इन्सानियत' , ' आझाद' , ' नया दौर' , 'मधुमती' , ' पैगाम' , ' कोहिनूर' , 'मुघल-ए-आझम' , 'गंगा जमुना' आणि 'राम और श्याम' यांसारख्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या भारतीय चित्रपटांमध्ये सातत्याने काम केले . त्यांच्या काही प्रशंसनीय परफॉर्मन्समध्ये, नादिया के पार , शबनम , जोगन , तराना , दाग , संगदिल , शिकस्त , फूटपाथ , अमर , देवदास , मुसाफिर , याहुदी , नेता , आदमी आणि सुंघर्ष यांचा समावेश आहे.

१९७० च्या दशकात कुमार यांच्या कारकिर्दीला उतरती कळा लागली, ज्यात 'गोपी' (१९७०) हे एकमेव मोठे यश होते. १९७६ मध्ये, त्यांनी चित्रपट अभिनयातून थोडा विराम घेतला आणि 'क्रांती ' (१९८१) या क्रांतिकारी नाटकाद्वारे पुनरागमन केले, जो त्या वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट होता. त्यांनी 'विधाता' (१९८२), 'कर्मा' (१९८६), आणि 'सौदागर' (१९९१) यांसारख्या चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारणे सुरू ठेवले. त्यांचा शेवटचा पडद्यावरील अभिनय व्यावसायिकदृष्ट्या अयशस्वी ठरलेल्या 'किला' (१९९८) या चित्रपटात होता, ज्यात त्यांनी दुहेरी भूमिका साकारली होती. कुमार यांनी नंतर २००० ते २००६ पर्यंत भारताच्या संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेचे सदस्य म्हणून काम केले .

दिलीपकुमार यांचे वैयक्तिक आयुष्य माध्यमांच्या मोठ्या चर्चेचा विषय होते; तथापि, त्यांनी स्वतः प्रसिद्धी आणि जाहिरातींपासून दूर राहणे पसंत केले होते. त्यांचे अभिनेत्री आणि अनेकदा सह-कलाकार असलेल्या मधुबाला यांच्यासोबत दीर्घकाळचे नातेसंबंध होते, जे १९५७ मधील नया दौर खटल्यानंतर संपुष्टात आले. त्यांनी १९६६ मध्ये अभिनेत्री सायरा बानू यांच्याशी विवाह केला आणि २०२१ मध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंत ते मुंबईचे उपनगर असलेल्या वांद्रे येथे राहत होते. चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना १९९१ मध्ये पद्मभूषण आणि २०१५ मध्ये पद्मविभूषण या देशाचे अनुक्रमे तिसरे आणि दुसरे सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांना १९९४ मध्ये चित्रपट क्षेत्रातील भारताचा सर्वोच्च सन्मान, दादासाहेब फाळके पुरस्कारानेही गौरविण्यात आले. १९९८ मध्ये, पाकिस्तान सरकारने दिलीपकुमार यांना त्यांचा सर्वोच्च नागरी सन्मान, निशान-ए-इम्तियाज प्रदान केला , ज्यामुळे हा सन्मान मिळवणारे ते एकमेव भारतीय ठरले. पेशावरमधील ज्या घरात दिलीपकुमार लहानाचा मोठा झाला, त्या घराला पाकिस्तानी सरकारने २०१४ मध्ये राष्ट्रीय वारसा स्मारक म्हणून घोषित केले.

दिलीप कुमार यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ रोजी ब्रिटिश भारतातील वायव्य सरहद्द प्रांतातील पेशावर शहराच्या किस्सा खवानी बाजार परिसरात मुहम्मद युसूफ खान म्हणून झाला. ते लाला गुलाम सरवर अली खान (१८९०-१९५०) आणि त्यांची पत्नी आयेशा बेगम (१८९७-१९४८) यांच्या बारा मुलांपैकी एक होते. त्यांचे वडील फळांचे व्यापारी होते. खान यांनी देवळाली (आता महाराष्ट्रात ) येथील बार्न्स स्कूलमध्ये शिक्षण घेतले, जिथे त्यांच्या वडिलांच्या फळबागा होत्या. ते पेशावरमध्ये त्यांचे बालपणीचे मित्र आणि नंतर चित्रपटसृष्टीतील सहकारी राज कपूर यांच्याच परिसरात वाढले. १९४० मध्ये, ते पुण्यात स्थलांतरित झाले आणि त्यांनी सुकामेव्याचे दुकान आणि एक कॅन्टीन सुरू केले. मूळचे पेशावरचे असूनही, १९४७ मध्ये भारताच्या फाळणीनंतर खान यांच्या कुटुंबाने मुंबईतच राहण्याचा निर्णय घेतला.खान यांनी त्यांच्या जन्मनावाने कधीही अभिनय केला नाही, त्यांनी १९४४ मध्ये ' ज्वार भाटा ' या चित्रपटातून दिलीप कुमार या रंगमंचीय नावाने पदार्पण केले. त्यांच्या ' दिलीप कुमार: द सबस्टन्स अँड द शॅडो' या आत्मचरित्रात त्यांनी लिहिले आहे की, हे नाव देविका राणी यांनी सुचवले होते , ज्या 'ज्वार भाटा'च्या निर्मात्यांपैकी एक होत्या. १९७० मध्ये एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, त्यांनी हे नाव त्यांच्या वडिलांच्या भीतीने स्वीकारले होते, ज्यांनी त्या काळातील सिनेमाच्या सामान्यतः खराब प्रतिमेमुळे त्यांच्या अभिनय कारकिर्दीला कधीही मान्यता दिली नव्हती.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार दि. ७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# उड्डाणपुलावरील पाईपलाईन गळती नागरिकांच्या अंगावर पडते घाण पाणी

## ◆ वाहनचालक व पादचाऱ्यांमध्ये संताप तातडीने दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी ७ जुलै

**अकोला :** शहरातील कलेक्टर बंगल्यासमोरील उड्डाणपुलावरून जाणाऱ्या पाईपलाईनमधून गळती होत असून, त्याचे पाणी थेट खाली रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्या डोळ्यांवर आणि अंगावर पडत आहे. त्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित विभागाच्या निष्काळजीपणावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.अकोला शहरातील कलेक्टर बंगल्यासमोरील उड्डाणपुलावरील पाईपलाईनमधून सातत्याने पाणी गळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या गळतीमुळे पुलाखालून जाणाऱ्या वाहनचालकांच्या तसेच पादचाऱ्यांच्या डोळ्यांवर अचानक पाणी पडत असून, वाहन चालविताना क्षणभर दृष्टी बाधित होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.



विशेष म्हणजे ही समस्या शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या ठिकाणी निर्माण झाली असतानाही संबंधित विभागाने अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना केलेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.स्थानिक नागरिकांनी अनेकदा ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्याचा दावा केला असून, तरीही परिस्थिती जैसे थे असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच उड्डाणपुलावरील गळती तातडीने दुरुस्त करून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या 50 ऑटोरिक्षांवर कारवाई

## ◆ शहरातील नवशिक्या चालकांना शिस्त लावणे आवश्यक

प्रतिनिधी ७ जुलै

**अकोला :** शहरातील वाहतूक समस्या जटील करण्यात काही ऑटोरिक्षा चालक हातभार लावतात. त्यात नवशिके चालक असतील तर विचारायची सोय नाही. सोमवारी ५० नियमबाह्य ऑटोरिक्षा चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली.


वाहने कुठेही उभी करणे, नियमांचे पालन न करणे अशांविरुद्ध कारवाई करण्यात आली असे सांगितले. शहरातील वाहतूक समस्या गंभीर झाली आहे. मुख्य चौकात सिग्नल असताना रहदारी सुरळीत राहते. नाही तर विचारायची सोय नाही. मनात येईल तशी वाहने धावत असतात. थोडी चूक देखील महाग पडू शकते. पोलिस विभाग, महापालिका यांच्या समन्वयातून वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पावले उचलली जात आहे. त्याचप्रमाणे ऑटोरिक्षा चालक, दुचाकी चालक यांनी देखील स्वयंशिस्त पाळणे आवश्यक आहे. त्या शिवाय बेशिस्तीला आळा बसणार नाही.



# हायड्रंट मध्ये मांजर मरून पडली

प्रतिनिधी ७ जुलै

**अकोला :** सिटी कोतवाली जवळ महापालिकेचे हायड्रंट आहे. येथील पाणी वापरण्यासाठी तसेच अग्निशमन दलाच्या बंबासाठी वापरले जाते. त्यामुळे या विहिरीची स्वच्छता करणे बंधनकारक नाही, असा विचार करून बहुदा स्वच्छता होत नसावी. कारण या विहिरीमध्ये मांजर मरून पडली आहे. मोबाईल कव्हर तसेच अन्य वस्तू पडल्या आहेत. परंतु येथील स्वच्छता व्हावी असे महापालिका प्रशासनाला वाटत नाही. महापालिका प्रशासनाचे शहर स्वच्छता तसेच हायड्रंट, पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता याकडे दुर्लक्ष असल्याची ओरड नागरिक करतात. सध्या हायड्रंट स्वच्छतेचा मुद्दा ऐरणीवर आलेला दिसतो. या विहीरीत घाण साचलेली आहे. अशात पाहणी केली असता मेलेले मांजर पडलेले दिसते. स्वच्छता विभागाला वेळ मिळाला तर येथील स्वच्छतेचा देखील विचार व्हावा अशी नागरिकांची अपेक्षा आहे.



# पेरलेली बियाणे न उगवल्यास कृषी विभागाकडे लेखी तक्रार करा : शामल कोकाटे

प्रतिनिधी ७ जुलै

**मुर्तीजापुर :** खरीप पेरणी ला सुरुवात झाली असून शेतकरी बांधव पेरणी करत असल्याने जर पेरलेली बियाणे ना उगवल्यास तातडीने कृषी विभागाकडे लेखी स्वरूपात तक्रार करावी असे आवाहन आत्मा समिती तालुकाध्यक्ष शामल भूषण कोकाटे यांनी केले आहे.

बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केलेली आहे परंतु काही ठिकाणी सोयाबीन न उगले गेले नसल्याची तक्रार समोर येत आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी अजिबात घाबरू नये मुर्तीजापुर मतदारसंघाचे आमदार हरीश पिंपळे शेतकऱ्यांची पाठीशी उभी आहे म्हणून शेतकऱ्यांनी बियाणे न उगवल्याची लेखी तक्रार गट नंबर बिल नंबर सुरक्षित ठेव खालील दिलेले संबंधित कागद प्रमाणे आपली तक्रार नोंदवावी जेणेकरून शेतकऱ्यांना न्याय मिळेल.

खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्र जुळणी करावी. शेतक-यांचा संपूर्ण नाव पत्ता व मोबाईल क्रमांक, शेत शिवाराचे नाव सातबारा ८ अ सह , कृषी केंद्राचे बिल शेतकऱ्यांचे नावसह, बिलावर लॉट नंबर पूर्ण असणे आवश्यक आहे, अर्जामध्ये पेरणी ची तारीख किती क्षेत्रावर बियाणे वापरले, बॅक चे टन व खालील पिशवी असणे आवश्यक आहे, प्रत्येक शेतकऱ्याची वैयक्तिक तक्रार असावी व आधार कार्ड झेरॉक्स आवश्यक आहे

# शहर पोलिसांच्या तत्परतेने महिलेचे हरवलेले 80 हजारांचे सोन्याचे दागिने परत

प्रतिनिधी ७ जुलै

**अकोट :** शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे प्रवासादरम्यान हरवलेले सुमारे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने शोधून संबंधित महिलेला परत देण्यात आले. पोलिसांच्या या कार्यवाहीचे सर्वत्र कौतुक होत आहे. येथील खानापूर वेस भागातील पुष्पा सुनील तेलगोटे यांनी अकोट शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार, त्या पुणे ते अकोट असा श्री गणेश ट्रॅव्हल्सने प्रवास करत असताना त्यांच्या गळ्यातील ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व २ ग्रॅम वजनाचे कानातील झुमके असे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने प्रवासादरम्यान हरवले होते. शहर पोलीस ठाण्यातील डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बाराहाते व त्यांच्या पथकाने तात्काळ तपास सुरू केला. श्री गणेश ट्रॅव्हल्सचे चालक रोहन गजानन भेंडारकर व वाहक सुभाष अजाबराव दांदळे यांची चौकशी करून ट्रॅव्हल्सची पाहणी करण्यात आली. या पाहणीत महिलेचे हरवलेले सोन्याचे दागिने मिळाले.



त्यानंतर पोलिसांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित महिलेला तिचे दागिने ताब्यात दिले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, डी.बी. पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बाराहाते तसेच पथकातील गणेश सोळंके, विपुल सोळंके, मोहन दुर्गे व अश्विन चौव्हाण यांनी यशस्वी तपास केला.

# आयटकच्या पाठपुराव्याला यश ; आशा गटप्रवर्तकांवरील निवडणूक कामाच्या सक्तीची दखल

प्रतिनिधी ७ जुलै

**अकोला :** आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा गटप्रवर्तक संघटना, अकोला जिल्ह्याच्या वतीने आशा गटप्रवर्तकांवर एस आय आर व बीएलओ निवडणूक कामाची सक्ती करू नये या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाची राज्य स्तरावर दखल घेण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील आशा गटप्रवर्तकांनी निवडणूक कामाच्या सक्तीविरोधात कॉ. नयन गायकवाड यांच्या नेतृत्वात ठाम भूमिका घेतली असून, त्यांच्या या लढ्याची दखल राज्याचे आयुक्त (राष्ट्रीय आरोग्य अभियान) यांनी घेतली आहे. त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी ही बाब जिल्हाधिकारी, अकोला यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी आशा गटप्रवर्तकांवर निवडणूक कामाची सक्ती करू नये, या संदर्भातील पत्राची योग्य ती दखल घेण्याचे निर्देशही दिले आहेत. संघटनेने स्पष्ट केले आहे की, आशा गटप्रवर्तक हे आरोग्य विभागातील मानधनावर कार्यरत कर्मचारी असून त्यांच्यावर अतिरिक्त निवडणूक कामाची सक्ती करणे अन्यायकारक आहे. या अन्याया विरोधातील लढा संघटना सातत्याने लढत असून, सर्व आशा गटप्रवर्तकांनी एकजूट ठेवून ठामपणे विरोध कायम ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त यांनी या प्रश्नाची दखल घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. असे आपल्या प्रसिद्ध पत्रकाव्दारे कॉ. मायावती बोरकर, कॉ. छाया वारके, कॉ. सविता प्रधान, यांनी आपल्या प्रसिद्ध पत्रक व्दारे कळवीत आहे.

# महानगरपालिकेच्या 4 नंबर शाळेतील वर्ग खोल्या गळतात, बसण्याची सोय नाही

## ◆ शाळेच्या आवारात पाणी साचल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांची भीती



प्रतिनिधी ७ जुलै

**अकोला :** महापालिकेच्या ४ नंबर शाळेतील वर्गात पाणी गळत असल्याने विद्यार्थ्यांना बसायची सोय नाही. विविध समस्यांचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. शाळेच्या आवारात देखील पाणी साचले आहे. त्यामुळे सरपटणारे प्राणी राहू शकतात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने उपाय करणे आवश्यक आहे. ही शाळा महिला बाल कल्याण समिती यांच्या प्रभागात येते. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

महापालिकेतील विद्यार्थी संख्या वाढावी. त्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु या शाळातील वर्ग खोल्या गळक्या असतील. तर मुलांनी कशा वातावरणात शिक्षण घ्यावे हा प्रश्न आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी शाळांची स्थिती, उपलब्ध सोयी सुविधा उपलब्ध आहे की नाही याची पाहणी केली नव्हती का असा प्रश्न पालक विचारत आहेत. या शाळेतील समस्या दूर करण्यासाठी महापालिका प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी आहे.

# अकोट शहरातील मोकाट गोवंश व अवैध कत्तलखान्यांविरोधात विहिंप–बजरंग दलाचे निवेदन

वि प्रतिनिधी ७ जुलै

**अकोट :** अकोट शहरातील मोकाट गोवंशाचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा, नगर परिषदेचा कोंडवाडा त्वरित सुरू करण्यात यावा तसेच शहरात सुरू असल्याची तक्रार असलेल्या अवैध कत्तलखान्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी विश्व हिंदू परिषद-बजरंग दल, अकोट प्रखंडच्या वतीने अकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोकाट गोवंश फिरत असल्याने वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यापूर्वीही या संदर्भात प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले होते; मात्र अपेक्षित कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय शहरात सुरू असल्याची तक्रार असलेल्या अवैध कत्तलखान्यांची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, गोवंश संरक्षणासंदर्भातील शासनाच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नियमित विशेष मोहीम राबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. विश्व हिंदू परिषद-बजरंग दलाने नगर परिषद प्रशासनाकडे मोकाट जनावरे पकडण्यासाठी कोंडवाडा तातडीने कार्यान्वित करणे, जनावरे मोकाट सोडणाऱ्या मालकांवर दंडात्मक कारवाई करणे तसेच शहरातील अवैध कत्तलखान्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या मागण्यांवर तात्काळ व प्रभावी कार्यवाही न झाल्यास विश्व हिंदू परिषद-बजरंग दलाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला.



# एदलापूर शेतशिवारात जुगारावर धाड, लाखोचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ७ जुलै

**हिवरखेड :** एदलापूर शेत शिवारातील शेतात सुरू असलेल्या जुगारावर ५ जुलैच्या संध्याकाळी अकोला विशेष पथकाने धाड टाकली. लाखोचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एलसीबीचे पीएसआय अनिल चव्हाण यांच्या माहितीनुसार एदलापूर शेतशिवारातील निंबाच्या झाडाखाली अडगावं अकोट येथील रहिवास हे ५२ जुगार खेळत होते. पोलिसांनी जुगारावर धाड टाकून त्यांना अटक केली. आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. ही कारवाई अकोला एलसीबीचे लेवरकर, सुलतान पठाण, मंगेश मेजर, सतीश पवार, राज चंदेल, श्रीकांत पातोड यांनी केली. या कारवाई मध्ये २२ हजार रुपये, ८ मोटरसायकली, ६ मोबाईल असा ७ लाख ८८ हजार ३००, रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत.

**NAME CHANGE**

सर्वत्र लोकास जाहिर करण्यात येते की माझे नाव
SK.MOEEN SK.SALIM GUNGIWALE
नसून
SHAIKH MOEEN SHAIKH SALIM GUNGIWALE
हे नाव आहे आणि सदर व्यक्ती एकच आहे. यापुढे मला
SHAIKH MOEEN SHAIKH SALIM GUNGIWALE
या नावाने ओळखावे
**- पत्ता -**
लक्कड गंज गुलाशन कॉलनी
अकोला, पिन ४४४००६

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुर्तिजापूर नगर परिषद तर्फे स्वागत



७ जुलै

**मुर्तिजापूर :** हिवाळी अधिवेशना दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुर्तिजापूर नगर परिषदेच्या वतीने स्वागत करण्यात आले. आमदार हरीश पिंपळे व नगराध्यक्ष हर्षल साबळे यांच्या उपस्थितीत नगरसेवक भारत आठवले यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत करून त्यांच्याशी चर्चा केली. मुर्तिजापूर शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी मतदारसंघाच्या संदर्भात आमदार हरीश पिंपळे यांनी सुद्धा चर्चा केली. यावेळी भाजपचे गट नेते गजानन नाकट, कोमल तायडे, अमोल प्रजापती उपस्थित होते.

# श्रीमती रतनबाई कानूंगा विद्यालयात प्रवेशोत्सव

प्रतिनिधी ७ जुलै

**हिवरखेड :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था हिवरखेड द्वारा संचलित श्रीमती रतनबाई ताराचंदजी कानुंगा विद्यालयामध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रवेशोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अनिल कुमारजी भोपळे हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे कार्यवाह श्री श्यामशील जी भोपळे, आडगाव येतील प्रतिष्टीत नागरिक अशोक राव घाटे,अनिल राव घाटे,संस्थे चे संचालक शिवकुमार जी मार्के तसेच माधव काळे सर उपस्थिती होते या प्रसंगी नव प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती या वेळी उपस्थित मान्यवर तसेच सर्व शिक्षक शिक्षिका यांनी नव प्रवेशित विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ नवीन पुस्तके तसेच नवीन दप्तर देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रवेशोत्सवावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नवीन आनंददायी शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या या उत्सवाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापक रवींद्र सोळंके यांनी तर संचालन पर्यवेक्षिका सौ. बांगर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता गोकुळा झापर्डे मॅडम,सीमा धुमाळे मॅडम,अंकुश हिवराळे सर,आरती इंगळे मॅडम,गायत्री इंगळे मॅडम, आनंद राऊत सर.महात्मा फुले वाचनालयाचे ग्रंथपाल चंद्रभूषण इंगळे विद्यालयाचे लिपिक योगेश राऊत तसेच शिपाई सुनील धुरदेव यांचे सहकार्य लाभले.

## निधन वार्ता

**सुमनताई शिंदे**



**हातरुण :** येथील माजी जिल्हा परिषद सदस्य भाऊसाहेब शिंदे यांची पत्नी सौ. सुमनताई शिंदे यांचे ६ रोजी रात्री निधन झाले. आज दुपारी हातोला येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पती, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

**मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.

- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

वैशिष्ट्ये :

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाल
मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# गोवंश तस्करीचा डाव उधळला

## ३४ बैलांची सुटका, ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ७ जुलै

**यवतमाळ** : तेलंगणा राज्यात कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ३४ गोवंशीय बैलांची आंतरराज्यीय तस्करी स्थानिक गुन्हे शाखेने उधळून लावली.

या कारवाईत सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून पाच वाहने आणि जनावरांसह सुमारे ४३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यातील विविध बाजारांतून गोवंशीय बैल पिकअप वाहनांद्वारे मुकुटबन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राजूर गोटा येथे आणण्यात आले होते. तेथून पैनगंगा नदीच्या पात्रातून तेलंगणा राज्यात कत्तलीसाठी त्यांची तस्करी होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी रविवारी पहाटे राजूर गोटा येथे धाड टाकली.

कारवाईदरम्यान अक्षय किशोर बोढे, अजीत दादाजी बारतीने, प्रफुल शामराव नंदुरकर, विठ्ठल शंकर उमरे, अजय भारत पिदुरकर आणि स्थानिक आरोपी ज्ञानेश्वर उर्फ नागेश तानबा भोयर यांना ताब्यात घेण्यात आले. घटनास्थळावरून पाच वाहने आणि ३४ गोवंशीय बैल जप्त करण्यात आले.

> ■ पोलिसांच्या माहितीनुसार, जनावरे अत्यंत क्रूरपणे दाटीवाटीने बांधून ठेवण्यात आली होती. त्यांच्यासाठी चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. चौकशीत ज्ञानेश्वर भोयर याने तेलंगणातील व्यापाऱ्यांच्या सांगण्यावरून मजुरीवर ही जनावरे नदीपात्रातून राज्याच्या सीमेपलीकडे पोहोचविली जात असल्याची माहिती दिल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. या प्रकरणातील किशोर खडसे, निलेश खडसे तसेच तेलंगणातील काही व्यापारी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

जप्त करण्यात आलेल्या सर्व जनावरांची पशुवैद्यकीय तपासणी करून त्यांना वणी तालुक्यातील गोरक्षण केंद्रात सुरक्षित ठेवण्यात आले आहे.

या प्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे आणि मुकुटबनचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व मुकुटबन पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली.

## राजूरमध्ये युवकाने पुढाकार घेत बुजविले खड्डे

प्रतिनिधी ७ जुलै

**वणी** : तालुक्यातील राजूर गावातील मुख्य रस्त्यांवर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येवर प्रशासनाकडून तत्काळ उपाययोजना होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर युवा सामाजिक कार्यकर्ते फैजल बशीर खान यांनी स्वतः पुढाकार घेत स्वखर्चातून रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले.

या कामासाठी आवश्यक असलेले मुरूम, वाहतूक आणि मजुरांचा खर्च त्यांनी स्वतः केला. जेसीबीच्या सहाय्याने खड्ड्यांमध्ये साहित्य टाकून रस्ता तात्पुरता वाहतुकीयोग्य करण्यात आला. या उपक्रमामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असून, स्थानिकांकडून या कृतीचे कौतुक केले जात आहे. राजूरमध्ये ग्रामपंचायत, तसेच विविध शासकीय यंत्रणा अस्तित्वात असतानाही रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रश्न कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत एका युवकाने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत पुढाकार घेतल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# सोयाबीन बियाणे उगवलेच नाही

## सहा गावांतील शेतकऱ्यांची नुकसानभरपाईची मागणी



प्रतिनिधी ७ जुलै

**कळंब** : तालुक्यातील सहा गावांतील शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या काही कंपन्यांच्या सोयाबीन बियाण्यांची उगवण न झाल्याचा आरोप करत तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. बाधित क्षेत्राचा पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सावरगाव, परसोडी (बु.), टालेगाव, पिंपळखुटी, माटेगाव आणि चिंचोली येथील शेतकऱ्यांनी विविध कंपन्यांचे सोयाबीन बियाणे २३ ते २८ जूनदरम्यान खरेदी करून पेरणी केली. मात्र, १० ते १२ दिवस उलटूनही बियाण्यांची उगवण झाली नसल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे पेरणीचा खर्च, बियाण्यांवरील गुंतवणूक आणि मजुरी वाया गेल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणी शेतकऱ्यांनी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून बाधित शेतांचे तातडीने पंचनामे करावेत तसेच शासनाकडून नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधूनही आठ दिवस उलटून गेले तरी कोणीही पाहणीसाठी आले नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

निवेदन देताना मनोज वानखेडे, महेश वानखेडे, नानाजी धुर्वे, योगेश धुर्वे, चंद्रशेखर वानखेडे, मोहन फाळे, खुशाल वैद्य, प्रेमचंद अलोणे, नंदू झांबरे, रामा कचरे, संजय फुलमाळी, आशिष वानखेडे, श्याम सोनाळे, लहुजी सोनाळे, बाळू कचरे, शंकर कचरे, ईश्वर कचरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# चाकूचा धाक दाखवून दहशत माजविणारा तरुण अटकेत

प्रतिनिधी ७ जुलै



**पांढरकवडा** : शहरातील शास्त्री वॉर्ड परिसरात हातात धारदार चाकू घेऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या तरुणाला पांढरकवडा पोलिसांनी अटक केली. आरोपीकडून धारदार चाकू जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पराग चंदू राय (वय २९, रा. शास्त्री वॉर्ड, पांढरकवडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, संबंधित तरुण हातात चाकू घेऊन परिसरात फिरत नागरिकांना धाक दाखवत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रमाकांत खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दुर्गामाता चौक परिसरात सापळा रचला. दरम्यान, संशयित पराग राय तेथे येताच पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून ३३ सेंमी लांबीचा धारदार चाकू जप्त करण्यात आला.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी रमाकांत खंदारे, एपीआय नितीन सुशीर, विलास जाधव, रजनीकांत पाटील, सुनील राठोड, सचिन काकडे आणि राजू मुत्तलवार यांच्या पथकाने केली.

# मतदार यादी पुनरिक्षणासाठी प्रशासन सज्ज; राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक

प्रतिनिधी ७ जुलै



**आर्णी** : मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) अभियानाच्या पार्श्वभूमीवर आर्णी तहसील कार्यालयात राजकीय पक्षांचे पदाधिकारी व बूथस्तरीय प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी वैशाख वाहूरवाघ यांनी अभियानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत आर्णी तालुक्यातील १ लाख २९ हजार ६०७ मतदारांची माहिती अद्ययावत करण्यात येणार आहे. यामध्ये ६६ हजार ४०६ पुरुष, ६३ हजार १९९ महिला आणि दोन तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, चार अतिरिक्त सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, १३ पर्यवेक्षक आणि १४१ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना विविध राजकीय पक्षांच्या २८५ बूथस्तरीय प्रतिनिधींचे (बीएलए) सहकार्य लाभणार आहे.

यावेळी तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांनी नागरिकांना आवाहन केले की, बीएलओ घरी आल्यानंतर दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. तसेच ईएफ फॉर्म (गणना पत्रक) अचूक माहिती भरून त्यावर स्वाक्षरी करून सहकार्य करावे. त्यामुळे मतदार यादीतील नाव कायम राहण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस निवासी नायब तहसीलदार उदय तुंडलवार, नायब तहसीलदार प्रमोद गुल्हाणे, नायब तहसीलदार डॉ. एस. एस. आदमूलवाड यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, बूथस्तरीय प्रतिनिधी आणि पत्रकार उपस्थित होते.

# वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याने उमरखेडकर त्रस्त

## शेतकरी, विद्यार्थी व व्यापाऱ्यांचा संताप

प्रतिनिधी ७ जुलै

**उमरखेड** : उमरखेड शहरासह तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियोजनशून्य वीजपुरवठ्यामुळे जनजीवन विस्कळीत होत असून, महावितरणच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येत आहे. व्यापाऱ्यांचे व्यवहार प्रभावित होत असून, कुटीर उद्योगांनाही आर्थिक फटका बसत आहे. दुसरीकडे, अपुऱ्या पावसामुळे पिकांना ठिबक व तुषार सिंचनाद्वारे पाणी देणाऱ्या शेतकऱ्यांनाही अनियमित वीजपुरवठ्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणकडून वीजबिल थकले की तत्काळ वीजपुरवठा खंडित केला जातो. मात्र, नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांनाही अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळत नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. वीजपुरवठा वारंवार खंडित होण्यामागील कारणांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच उमरखेड तालुक्यातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डिक्की फोडून ३ लाखांची रोकड लंपास

## बँकेपासूनच पाळत ठेवल्याचा संशय

प्रतिनिधी ७ जुलै




**पुसद** : मुलाच्या उपचारासाठी बँकेतील मुदतठेव (एफडी) मोडून काढलेली तीन लाख रुपयांची रोकड भरदिवसा दुचाकीच्या डिकीतून अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना पुसद शहरात घडली. युनियन बँकेतून पैसे काढल्यानंतर संबंधित महिलेवर चोरट्यांनी पाळत ठेवली असावी, असा प्राथमिक संशय व्यक्त होत असून, पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे.

या प्रकरणी पूजा प्रतीक जगताप (वय २६, रा. वसंतनगर, पुसद) यांनी पुसद शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादींच्या मुलाची प्रकृती बिघडल्याने त्याच्यावर डॉ. चिलकर यांच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपचारासाठी पैशांची गरज असल्याने त्यांनी सोमवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पुसद येथील युनियन बँकेतून तीन लाख रुपयांची एफडी मोडून रक्कम काढली. ही रक्कम त्यांनी ऑरेंज व पांढऱ्या रंगाच्या बॅगेत ठेवली होती. त्याच बॅगेत व्हिवो कंपनीचा मोबाईल, धनादेश, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि बँकेचे पासबुक अशी महत्त्वाची कागदपत्रेही होती.

बँकेतून बाहेर पडल्यानंतर त्यांनी संबंधित बॅग त्यांच्या ज्युपिटर (एमएच-२९ बीके-०८३३) या दुचाकीच्या डिकीत ठेवली. त्यानंतर मुलाचा वैद्यकीय अहवाल घेण्यासाठी त्या पाठक हॉस्पिटलच्या लॅबमध्ये गेल्या. काही मिनिटांनंतर शनि मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर मोबाईल काढण्यासाठी डिकी उघडली असता बॅग गायब झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ परत जाऊन परिसरात शोध घेतला; मात्र बॅग मिळून आली नाही.

चोरीस गेलेल्या ऐवजात तीन लाख रुपयांची रोकड, सुमारे दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल, सिमकार्ड तसेच बँकेची महत्त्वाची कागदपत्रे असा एकूण तीन लाख दहा हजार रुपयांचा माल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनेनंतर महिलेने भावासह पुसद शहर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

शहरातील वर्दळीच्या ठिकाणी आणि पोलिस ठाण्यापासून अल्प अंतरावर भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. बँक परिसरात ग्राहकांवर पाळत ठेवून चोरी करणारी टोळी सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत असून, या प्रकरणाचा लवकर छडा लावण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# पुसदमध्ये 'एक पेड माँ के नाम' मोहिमेला प्रारंभ

## आईच्या नावाने वृक्षसंवर्धनाचा संकल्प

प्रतिनिधी ७ जुलै




**पुसद** : पर्यावरण संवर्धनाला सामाजिक बांधिलकीची जोड देत 'माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद'च्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

वाढते तापमान, वृक्षतोड आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याच्या पार्श्वभूमीवर केवळ वृक्षारोपण न करता झाडे जगविणे हीच खरी काळाची गरज असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आईप्रमाणेच निसर्गही निःस्वार्थपणे सर्वांना देत असतो. त्यामुळे आईच्या स्मृतीत किंवा तिच्या हस्ते वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करणे, हा पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी मार्ग ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

मोहिमेतील पहिले वृक्षारोपण संस्थेचे अध्यक्ष गजानन दत्तात्रय जाधव यांच्या मातोश्री शांताबाई दत्तात्रय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कर्मयोगी संत गाडगे बाबा स्मृतीस्थळ, जाधव बाग, पार्डी रोड (लिंबी) येथे प्रसिद्ध सप्तखंजिरी वादक पंकजपाल महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत वडाच्या रोपाची लागवड करून उपक्रमाची सुरुवात झाली.

यापुढे 'माणुसकीची भिंत मदत केंद्र' येथे अन्नदानासाठी इच्छित तारीख उपलब्ध नसल्यास संबंधित अन्नदात्यांना त्यांच्या आईच्या नावाने वृक्षारोपण करण्याचे आवाहन करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेने दिली. कार्यक्रमाला दत्तात्रय जाधव, पंजाब ढेकळे, संतोष गावंडे, अनंता चतुर, मधुकर चव्हाण, अरुण नागुलकर, गणेश सावंत, दिगंबर देशमुख, मंगेश भगत, प्रमोद ठाकूर, दादाराव पाईकराव, आदित्य जाधव यांच्यासह मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था, वसुंधरा बहुउद्देशीय संस्था, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, प्रा. वसंत खाडे, प्रा. खाडे मॅडम, जयसिंग राठोड, जाधव परिवारातील सदस्य तसेच लिंबी-पार्डी परिसरातील वृक्षप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेत 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त केला.

# प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना : ४१ गावांच्या सरपंच-सचिवांना ग्राम विकास आराखड्याचे प्रशिक्षण

प्रतिनिधी ७ जुलै

**यवतमाळ** : प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेअंतर्गत निवड झालेल्या यवतमाळ जिल्ह्यातील ४१ गावांच्या सरपंच, सचिव आणि संगणक ऑपरेटर यांना ग्राम विकास आराखडा तयार करण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. समाज कल्याण विभागाच्या वतीने आयोजित या प्रशिक्षणाचे अध्यक्षस्थान सहाय्यक आयुक्त मंगला मुन यांनी भूषविले.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेअंतर्गत सन २०१८-१९ ते २०२५-२६ या कालावधीत जिल्ह्यातील ४१ गावांची निवड करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने रविवारी आयोजित प्रशिक्षणात ग्राम विकास आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रपत्र क्रमांक १ ते ८ बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र युजर आयडी व पासवर्ड तयार करून त्याची माहिती संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांना देण्यात आली. तसेच प्रपत्र क्रमांक १, २, ३-अ, ३-ब आणि ४ अचूकपणे भरण्याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षणही देण्यात आले. या प्रशिक्षणास सहाय्यक आयुक्त मंगला मुन, प्रशांत विष्णू साठे तसेच निवड झालेल्या ४१ गावांचे सरपंच, सचिव आणि संगणक ऑपरेटर उपस्थित होते.



# सराईत घरफोड्या अखेर पोलिसांच्या जाळ्यात; दोन गुन्ह्यांची उकल

प्रतिनिधी ७ जुलै

**यवतमाळ** : शहरात घडलेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांचा गुन्हे प्रकटीकरण शाखा व अवधूतवाडी पोलिसांनी यशस्वी उलगडा करत अट्टल घरफोड्या आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून दोन्ही गुन्ह्यांतील चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

> ■ आरोपीला विधिवत अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली असून, त्याच्याकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण मनोज जाधव (वय २८, रा. नेताजी नगर) याला अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध यापूर्वी घरफोडी व चोरीचे ४० हून अधिक गुन्हे विविध पोलिस ठाण्यांत दाखल असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. चौकशीदरम्यान त्याने शहरातील दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी संबंधित मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अवधूतवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक अजित कदम यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक कपिल मिश्रा, सफौ. सुरेश मेश्राम, पोलीस हवालदार विशाल भगत, बलराम शुक्ला, विठ्ठल चव्हाण तसेच पोलीस कर्मचारी रुपेश ढोबळे, सचिन राठोड, मोहम्मद भगत, कमलेश भोयर, राज कांबळे, योगेश चोपडे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

५

# सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## १३ जुलै रोजी विभागीय व महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**अमरावती:** शासन सामान्य प्रशासन विभाग आणि महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रक व निर्णयानुसार दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन आणि महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. यानुषंगाने आगामी जुलै महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी, म्हणजेच दिनांक १३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता विभागीय लोकशाही दिन आणि महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनात आपल्या तक्रारी मांडू इच्छितो अशा सामान्य नागरिकांना आणि महिलांना सूचित करण्यात आले आहे की, त्यांचा तक्रार अर्ज हा तालुका, जिल्हा किंवा महानगरपालिका लोकशाही दिनानंतरचाच असावा. हा अर्ज विहीत नमुन्यात, लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# हृदयविकारापासून संरक्षण देणारी जीवनरक्षक सुविधा आता अमरावतीत!

## प्रथमच 'एआयसीडी'चे यशस्वी प्रत्यारोपण, डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय

प्रतिनिधी ७ जुलै

**अमरावती :** येथील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्रथमच ऑटोमेटेड इम्प्लांटेबल कार्डिओव्हर्टर डिफिब्रिलेटर (एआयसीडी) चे यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. ही अत्याधुनिक व जीवनरक्षक शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पूर्णतः यशस्वीरीत्या पार पडली.

ही प्रक्रिया ४७ वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आली. ते डायलेटेड कार्डिओमायोपॅथी या आजाराने ग्रस्त होते. त्यांच्या हृदयाची पंपिंग क्षमता केवळ २२ टक्के होती. अलीकडेच त्यांना व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डियाचा गंभीर झटका आला होता, ज्यामुळे त्यांच्या जीवाला तात्काळ धोका निर्माण झाला. आपत्कालीन परिस्थितीत बाह्य डिफिब्रिलेटरच्या





सहाय्याने त्यांच्या हृदयाचे ठोके पुन्हा सुरळीत करण्यात आले. त्यानंतर करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासणीत भविष्यात पुन्हा जीवघेणा हृदयाच्या ठोक्यांचा विकार होण्याची शक्यता अत्यंत जास्त असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय उपचार मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांच्यामध्ये ऑटोमेटेड इम्प्लांटेबल कार्डिओव्हर्टर डिफिब्रिलेटर प्रत्यारोपित करण्यात आला, ज्यामुळे भविष्यात होणाऱ्या अचानक हृदयविकारामुळे मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.

ही जटिल व जीवनरक्षक प्रक्रिया डॉ. नीरज राघानी, वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट यांनी आणि डॉ. पुष्पेंद्र साहू, वरिष्ठ कॅथ लॅब तंत्रज्ञ अश्विन नरगडे, सहाय्यक कॅथ लॅब तंत्रज्ञ चेतन गुर्जर, प्रतीक विरुळकर व आनंद मोरे यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पूर्ण केली. या प्रसंगी मेडिसिन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. शुभांगी वर्मा, डॉ. अजय डफळे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. निलेश चांडक तसेच कार्डिओलॉजी व मेडिसिन विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. या यशस्वी कामगिरीसाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाबद्दल व सातत्यपूर्ण प्रोत्साहनाबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे पदाधिकारी व सदस्य, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, डॉ. पवन टेकाडे, डॉ. सोमेश्वर निर्मळ आणि डॉ. स्वप्नील मोहोड यांनी संपूर्ण तज्ज्ञ चमूचे अभिनंदन केले.

**'एआयसीडी' म्हणजे काय?**

एआयसीडी हे एक लहान, अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरण असून ते त्वचेखाली प्रत्यारोपित केले जाते. त्याची लीड (तार) हृदयामध्ये बसविली जाते. हे उपकरण दिवस-रात्र सतत हृदयाच्या ठोक्यांवर लक्ष ठेवते. जर हृदयात व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डिया किंवा व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन सारखी धोकादायक व अनियमित हृदयगती निर्माण झाली, तर एआयसीडी काही सेकंदांत ती ओळखून आवश्यकतेनुसार विद्युत धक्का देतो आणि हृदयाचे ठोके पुन्हा सामान्य स्थितीत आणतो. त्यामुळे रुग्णाला अचानक होणाऱ्या हृदयविकारामुळे मृत्यूपासून संरक्षण मिळते.

**वेळेवर उपचार घेतल्यास जीव वाचू शकतो**

भारतात दरवर्षी हजारो रुग्णांचा मृत्यू अचानक हृदयविकारामुळे होतो. यापैकी अनेक रुग्णांचे प्राणं छण्ड सारख्या आधुनिक उपकरणामुळे वाचू शकतात. त्यामुळे ज्या रुग्णांची हृदयाची पंपिंग क्षमता कमी आहे किंवा ज्यांना वारंवार बेशुद्ध पडणे, हृदयाचे ठोके वेगाने धावणे अथवा न्ऊ सारखी समस्या उद्भवली असेल, त्यांनी हृदयरोगतज्ज्ञांचा सल्ला घेऊन एआयसीडीची आवश्यकता तपासून घ्यावी.

## बूस्टर व ग्रीन गोल्ड बियाणे उगवले नाही, शेतकऱ्यांचा आरोप

### अमरावती जिल्ह्यातील तिवसा, मोर्शी शेतकऱ्यांवर दुबारा पेरणीची वेळ

प्रतिनिधी ७ जुलै



**अमरावती:** जिल्ह्यातील दोन तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुबारा पेरणी करण्याचीं वेळ आली आहे.बूस्टर सिड्स व ग्रीन गोल्ड या कंपनीचे सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांनीं पेरले होते. दहा दिवस उलटून देखील बियाणे उगविले नसल्याने मोर्शी व तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना आता दुबारा पेरणी करावी लागणार आहे.त्यामुळे संताप्त शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईसह संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची मागणी केली जातं आहे.

खरीप हंगामात ७जून नंतर शेतकऱ्यांकडून प्रामुख्याने सोयाबीन, तूर, पराटी या पिकांची पेरणी केली जाते. यावर्षी पावसाचे आगमन उशिरा झाल्याने पेरणी लांबनीवर गेली. पेरणी तर आटोपली मात्र पेरलेले बियाणे उगवले नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली असून आता दुबारा पेरणीची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.बूस्टर सिड्स हूतूतू व ग्रीन गोल्ड या कंपनीचे बियाणे अनेक शेतकऱ्यांनीं दोन आठवड्या पूर्वी पेरले परंतु बियाणे निघालेच नाही, त्यामुळे शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईसह कंपनी विरुद्ध कारवाई करण्याचीं मागणी केली जातं आहे. दरम्यान कृषी केंद्र संचालक व काही शेतकऱ्यांनीं बूस्टर व ग्रीन गोल्ड या कंपनीच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क केला असता कर्मचारी नॉट रिचेबल असल्याचे सांगण्यात येते.

# विनायक विज्ञान महाविद्यालयाद्वारा विविध शाळांमध्ये 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिना'चे यशस्वी आयोजन

प्रतिनिधी ७ जुलै

**नांदगाव खं.:** विनायक विज्ञान महाविद्यालय, नांदगाव खं. येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग, Green Army Club आणि राष्ट्रीय छात्र सेना (NCC – ६२ महाराष्ट्र बटालियन, अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने ३ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिनानिमित्त विविध शाळेमध्ये उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश एकदाच वापरल्या जाणाऱ्या (Single-ues) प्लास्टिकचा वापर कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे हा होता.




याकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. स्वप्निल तिनखेडे यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमाची माहिती सांगुन प्लास्टिक पिशवीचे दुष्परिणाम समजावून सांगितले.. प्लास्टिक पिशवीची वाढती समस्या दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत आहे. राष्ट्रीय सेवा प्रमुख डॉ. प्रीती देशमुख यांनी आजच्या या धकाधकीच्या जीवनात प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे, कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे तसेच पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करण्याचे आवाहन केले. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात नमूद केले.ष्यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक श्री. सुबोध बनसोड, डॉ. प्रीती देशमुख, ऊाहैंस्ब् ण्त्लं चे समन्वयक डॉ. स्वप्नील तिनखेडे तसेच ङङराष्ट्रीय छात्र सेना (ञ्ण्) चे लेफ्टिनंट डॉ. प्रशांत बी. खरात यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिक प्रदूषणाचे पर्यावरण व मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, भारतातील सिंगल-यूज प्लास्टिकवरील बंदी, 5R (Refues, Reduce, Reues, Recycle, Recover) संकल्पना, कचरा व्यवस्थापन तसेच कापडी पिशव्यांच्या वापराचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमांतर्गत YES School, School of Smart Kids नांदगाव कनिष्ठ महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# रेतीची चोरटी वाहतूक करणारे हायवा ट्रक जप्त!

## ♦ स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणकडून कारवाई

प्रतिनिधी ७ जुलै

**अमरावती:** रेतीची चोरटी वाहतुक करणारे हायवा ट्रक स्थानिक गुन्हे शाखा व अमरावती ग्रामीण पोलिस स्टेशन यांनी संयुक्त कारवाई करून जप्त केले. या धडक कारवाईमुळे रेती माफीयांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक निकेतम कदम यांनी अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्याविरुध्द कारवाई करण्याच्या सुचना स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांना निर्गमीत केल्या होत्या. त्याअनुषंगाने ५ जुले रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणचे पथक, पो.स्टे. परतवाडा हद्दीत विनापरवाना रेती वाहतुकीवर कार्यवाही करणेकामी पेट्रोलींग



करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरुन कैकाडी पुरा रोड, अग्रेसन भवन समोर परतवाडा येथे अवैधरित्या विनापरवाना रेती वाहतुक करीत असताना एक फ्रॉमट्रॅक ४५ कंपनीचा ट्रॅक्टर मुंडा क्रमांक एम एच २७ एल ६८५७ व विना क्रमांकाची ट्रॉली (किंमत ५लाख) व त्यामध्ये अंदाजे १ ब्रास रेती, असा ५ लाख ७ हजारांचा मुद्देमाल आरोपी अरविंद गंगाराम मावसकर (२८) रा. गौलखेडा बाजार, परतवाडा, फरार गोलु खान समशेर खान रा. देशमुख प्लॉट परतवाडा यांचेकडुन जप्त करण्यात आला. तसेच पो.स्टे. शेघाट हद्दीत विनापरवाना रेती वाहतुकीवर कार्यवाही करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या खबरेवरुन पुसला टोल प्लाझा येथे अवैधरित्या विनापरवाना रेती वाहतुक करणारा एक टाटा कंपनीचा हायवा (किंमत २० लाख) व त्यामध्ये अंदाजे ५ ब्रास रेती कि. ४० हजा रूपये असा एकूण २० लाख ४० हजारांचा मुद्देमाल आरोपी देवीदास गुलाबराव मरसकोल्हे (३८) रा. पुसला, तुषार प्रकाश टेकाम (२०) रा. पुसला, दिपक काळे रा. पुसला यांचेकडुन जप्त करण्यात आला.तसेच दुसरा हायवा २० लाख ४०हजारांचा मुद्देमालासह आरोपी गणेश रमेश कोकोडे (३८) रा. पुसला, प्रशांत सुर्यभान कुमरे (१९) रा. पुसला, धनराज नथीले रा. पुसला यांचेकडुन जप्त करण्यात आला. वर नमुद कार्यवाही मध्ये एकूण ४५ लाख ८७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधीत पो.स्टे. ला त्यांचे विरुध्द गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

# विभागीय आयुक्तालयात संत गुलाबराव महाराज यांना अभिवादन

प्रतिनिधी ७ जुलै

**अमरावती:** प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज अपर आयुक्त संजय जाधव यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही



प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# 'सिनेमा सिनेमा खेळताना' एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

## ♦ बिइंग आर्टिस्ट अकॅडमी ऑफ फिल्म अँड थिएटर आर्टस् चा उपक्रम

प्रतिनिधी ७ जुलै

**अमरावती:** चित्रपट, नाटक, वेब सिरीज आणि न्यूज चॅनेल यांसारख्या माध्यमांमध्ये रोजगार, व्यवसाय आणि नोकरीच्या संधी शोधणाऱ्या कलाकारांसह विद्यार्थ्यांना चित्रपट उद्योगाची तांत्रिक ओळख आणि निर्मितीचे पायाभूत प्रशिक्षण देण्यासाठी, अमरावती स्पंदन परिवार बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित बिइंग आर्टिस्ट अकॅडमी ऑफ फिल्म अँड थिएटर आर्टस्, अमरावती येथे ठसिनेमा सिनेमा खेळतानाठ या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन रविवारी, १२ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे. या निःशुल्क कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी १० जुलै २०२६ पर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन अकॅडमीच्या संचालिका स्नेहा वासनिक यांनी केले आहे.

चित्रपट तसेच माध्यमाच्या रीतसर शिक्षणानंतर शासकीय संस्था, अशासकीय संस्था, सरकारी कार्यालये, खाजगी संस्थामधे करियर च्या संधी, तसेच फेलोशीप्स, स्कॉलरशिप, अर्थ सहाय्य मिळविण्याचे विविध मार्ग आणि चित्रपट उद्द्योजकता जनगृती करण्याच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून चित्रपट निर्मितीची प्रक्रीया, निर्माता, कथा लेखन, दिग्दर्शन, अभिनय, छायाचित्रण, प्रकाश योजना, संकलन, ध्वनी, कला दिग्दर्शन, रंगभूषा, वेशभूषा, जाहिरात व प्रसिद्धी, सेन्सॉर सर्टीफिकेशन, वितरण व्यवस्था, आर्थिक गुंतवणुक व मोबदला या सर्व विभागांची कार्य पद्धती तसेच सिनेमा किंवा चित्रपट म्हणजे काय? कला-व्यवसाय-उद्योग-करियर म्हणून या क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा असावा? यावर चर्चात्मक मार्ग दर्शन करण्यात येणार आहे. तसेच निवळक लघुपटांचे प्रदर्शन आणि निरिक्षनात्मक चर्चा प्रश्नोत्तरातुन करण्यात येणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष पंकज धंदर यांनी सांगितले.

# दर्यापूर ठाणेदारांनी केली गोरक्षण संस्थानची पाहणी

## गोरक्षण स्थळावरील गोसेवा व शेतीपूरक संशोधन कार्य प्रशंसनीय - ठाणेदार अजित राठोड

प्रतिनिधी ७ जुलै

**दर्यापूर :** दर्यापूर परीसरात कार्यरत असलेल्या गोरक्षण स्थळावरील कार्य हे अत्यंत प्रभावी असून इतरांसाठी आदर्श निर्माण करणारे ठरते असे गौरवपूर्ण प्रतिपादन दर्यापूर येथील पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार अजित राठोड यांनी केले . तालुक्यातील तथा दर्यापूर पोलीस स्टेशन हद्दीत समावेश असलेल्या माहुली (धांडे ) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळाला ठाणेदार अजित राठोड यांनी सदिच्छा भेट देऊन संपूर्ण पाहणी तथा शासकीय सुचनेतील मार्गदर्शना अंतर्गत कामकाजाबाबत संपूर्ण माहिती



घेतली . संस्थेचे संस्थापक संचालक प्रा गजानन भारसाकळे यांनी चर्चेदरम्यान या संस्था स्थळावरील शेतीपूरक खत व गोमय उत्पादने निर्मिती तथा अन्य संशोधन कार्य याविषयी आजवर प्राप्त यशाची माहिती याबाबत वार्तालाप केला . राठोड यांनी संस्था स्थळावरील स्वच्छता तथा पर्यावरण पूरक वातावरणाचा आवर्जून उल्लेख करून भविष्यातील अधिक कार्यास्तव शुभेच्छाही प्रदान केल्या. गोरक्षण स्थळाला आवर्जून भेट दिल्याबद्दल संस्थेनी ठाणेदार राठोड यांचे हस्ते गोपूजन घेऊन त्यांचा संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार केला . यावेळी जेष्ठ पत्रकार एस जी मोरे तथा सेवा निवृत्त पशु वैद्यकीय अधिकारी डॉ दिपक उफाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# ज्ञानेश्वर महाराजाच्या आषाढी वारी पालखीचे हनुमान गढी येथे स्वागत

## सुनिल राणा यांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी ७ जुलै

**अमरावती :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त हनुमान गढी येथे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पालखीचे उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी भ्एझ् मार्गदर्शक सुनील राणा यांच्या उपस्थितीत ह.भ.प. सागर देशमुख महाराज यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून संत परंपरेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या स्वागत सोहळ्याला मोठ्या संख्येने वारकरी, भाविक व नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी



पालखीसोबत असलेल्या श्री. संत गोपिका माता (रेहकी, जि. वर्धा) तसेच विदेही श्री अनुसया माता (पारडसिंगा) यांच्या पवित्र पादुकांचे विधिवत अभिषेक व पूजन करण्यात आले. ठज्ञानोबा-तुकारामठच्या जयघोषात आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. उपस्थितांनी संतांच्या पादुकांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले.

आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा दिवस मानला जातो. या दिवशी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक एकत्र येतात. त्याच पार्श्वभूमीवर आयोजित या स्वागत सोहळ्याने धार्मिक ऐक्य, सामाजिक बांधिलकी आणि संत परंपरेचा गौरव अधोरेखित केला.

यावेळी आमदार रवि राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या माध्यमातून पालखीसोबत असलेल्या सर्व वारकरी व भाविकांसाठी महाप्रसाद (भोजन) व्यवस्था करण्यात आली. दिवसभराचा प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांनी या भोजन व्यवस्थेचे स्वागत करण्यात आले.

# अमरावतीत 'एनपीएस संचय आउटरीच' कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी ७ जुलै

**अमरावती:** पी. एफ. आर.डी.ए. आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अग्रणी बँक कार्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक हॉटेल गौरी इन येथे 'एनपीएस संचय आउटरीच' कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्ह्यातील नागरिक आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी नाबार्डच्या रश्मीता पंचाळे, पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाचे सचिन राठी, रघुवीर सिंह चरण, खादी व



ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा अधिकारी प्रदीप चेचरे, माविमचे डॉ. रंजन वानखडे, अभिनंदन बँकेचे विजय बोथरा, शिवाजी देठे, बँक ऑफ महाराष्ट्राचे रवी जैन, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सार्थक सोनटक्के आदी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना मुख्य अतिथींनी 'एनपीएस संचय' योजनेबद्दल माहिती दिली. एनपीएसमधील नियमित गुंतवणूक ही एखाद्या व्यक्तीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि सेवानिवृत्तीनंतर सन्मानाचे जीवन जगण्यासाठी एक मजबूत सुरक्षा कवच म्हणून कशी काम करते, हे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे सांगितले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पीएफआरडीएचे राहुल यांनी कॉमन सर्व्हिस सेंटर चालक आणि उपस्थितांसाठी संवादात्मक सत्राचे नेतृत्व केले, ज्यामध्ये नागरिकांनाही थेट सामावून घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक सुनील पांडे यांनी केले. तर आभार जिल्ह्याचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार, दि.७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात धुवाधार..!




## अतिवृष्टी झाल्यास सतर्कतेचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @. वाशीम ●

जिल्ह्यात हजेरी लावल्याने नदी नाल्यांना पाणी आले आहे. तर धरणांच्या जलसाठ्यात वाढ होत आहे. नदीतीरावरील तसेच प्रकल्पलगतच्या गावाना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिल्ह्यात काही दिवसापासून संततधार पाऊस सुरू आहे. तर काही ठिकाणी अतिवृष्टी झाल्यामुळे पुरपरिस्थती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यास काही भागातील नदी, नाले, उग्ररूप धारण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने ११७ गावांना पुराचा संभाव्य धोका असल्याचा इशारा दिला. आणीबाणीच्या परिस्थितील त्वरीत मदत पोचविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. प्रशासनाने या अगोदर अतिवृष्टीमुळे पुराने तडका बसलेल्या गावाना या वर्षी सर्तकतेचा इशारा आहे.

## जिल्ह्यातील १ १ ७ गावांना पुराचा धोका

. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील प्रकल्पाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. कारंजा, मानोरा आणि मंगरूळपीर तालुक्यात पाऊस चांगला झाला तर मालेगाव तालुक्यात मात्र पावसाचे प्रमाण कमी असून नागरिकांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

वाशीम तालुक्यातील पैनगंगा नदीला पुर आल्यास केकतउमरा , तोंडगाव, देवठाणा, हिस्सेबोराळा, उकळीपेन, वारला, झोडगा,



जयपूर, वाई, शिरपूटी, सावरगाव जिरे, कळंबा महाली, खंडाळा, आडोळी, सुकळी तर वाशिम शहरातील नाल्याला पूर आल्यास गोदेश्वर, बालाजी मंदिरामागील भाग जांभरूण परांडे, तसेच काच नदीमुळे मांगुळझनक, नेतन्सा, गोवर्धन, दापुरी खुर्द, वडजी हे गावे बाधीत होतात मानोरा तालुक्यातील पुस नदीला पूर आल्यास वटफळ, मेट्टा, रूई, गोस्ता, इंगलवाडी तर २ दिवसाच्या संततधार पावसामुळे अरूणावती नदीने धोक्याची पातळी ओलाडली होती. मालेगाव तालुक्यामध्ये निर्गुणा, तानी, बेडकी, काटेपूर्णा नदीला पूर आल्यास सोनाळा, भौरद, भिलदुर्ग, वाघी बु., पांगरीबंदी, कुरळा, सुकांडा, दुबळेल, वाडीरामराव ही गावे बाधीत होतात. हवामान खात्याने सर्वदूर जोरदार पाऊसाचे संकेत दिले आहे. त्यामुळे काही ठिकाणी अतिवृष्टी झाल्यास नदी नाल्यालगच्या गावांना प्रशासनाने सर्तकतेचा इशारा दिला आहे.

## थोडक्यात

### आज शेतीविषयक कार्यशाळेचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना बाजारपेठेतील किमतीच्या चढ-उतारांपासून संरक्षण मिळवून देण्यासाठी आणि कृषी व्यवसायाला बळकटी देण्यासाठी एका विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, आत्मा कृषी विभाग, वाशिम आणि 'एनसीडीईएक्स इन्स्टिट्यूट ऑफ कमोडिटी मार्केट्स अँड रिसर्च' यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापित 'किंमत जोखीम व्यवस्थापन कक्ष'च्या माध्यमातून मंगळवार, दिनांक ७ जुलै २०२६ रोजी वाशिम येथील 'विदाता प्रशिक्षण केंद्र' येथे या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा मुख्य विषय 'शेतमाल वायदा बाजाराद्वारे किंमत जोखीम व्यवस्थापन व कृषी पायाभूत सुविधा निधी' असा आहे.

या एकदिवसीय प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञांद्वारे शेतमाल बाजाराचे महत्त्व, भविष्यातील व पर्यायी करारांची (फ्युचर्स आणि ऑप्शन्स) नेमकी कार्यपद्धती आणि शेतीमालाच्या किमती अचानक घसरल्यास होणारे नुकसान टाळण्यासाठी किंमत सुरक्षिततेचा (हेजिंग) प्रभावी वापर कसा करावा, यावर सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. यासोबतच, उपस्थित शेतकरी आणि संस्थांना आर्थिक साक्षरता, शेअर बाजार व व्यापाराची (ट्रेडिंग) प्राथमिक माहिती, 'नाबार्ड' मार्फत हळद वायद्यासाठी उपलब्ध असलेल्या विशेष अनुदानित योजना आणि कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत मिळणाऱ्या विविध शासकीय सवलतींची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. वाशिम जिल्ह्यातील सर्व शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच वैयक्तिक शेतकऱ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. सर्व संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील, उत्साही आणि कृषी व्यवसायामध्ये रुची असणाऱ्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आत्माच्या प्रकल्प संचालक अनिसा महाबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट), काटा रोड, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वाशिम येथे संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

### वाशीम येथील फुले मार्केट नव्हे 'फेल मार्केट'!

**वाशीम :** नगरपरिषदेच्या वतीने शहरातील मोक्याच्या जागी बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या महात्मा फुले संकुलाची आजघडीला दुरावस्था झाली असून या संकुलाची स्वच्छता व देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकासकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील दुकानदारांच्या व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे.

## राजकीय 'कुरघोडी', बळीराजा देशोधडी

# महागाई, खताची कृत्रिम टंचाई !




### * माणुसकी बईमान नाही राहीले ईमान पैसाच महान * बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेत...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सदैव संकटात नैसर्गीक संकटाबरोबर कृत्रीम संकाटाने बळीराजा होरपळून निघात आहे. कारण ५ वर्षाअगोदर कोरोनाने घेरले त्यानंतर पेरणी पूर्वी बळीराजाला अनुदानाचे बी बियाणे मिळत नाही. कृत्रीम खत टंचाईला सामोरे जावे लागते. त्यातच बोगस बियाण्यातून फसवणूक झाली. दुबार तिबार पेरणीचे संकट ओढावले. एवढे करूनही ऐन हंगामाच्या तोंडावर अतिवृष्टीमुळे हातचा आलेला घास गेला. बोगस बियाणे प्रकरणी ५ हजार तक्रारी करून कारवाई नाही झाली आणि मदतही नाही झाली अतिवृष्टीचा सर्व्हे कागदावरच झाला. मात्र शासनाने जाहीर केलेली मदत वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळालाच नाही. वर्षी परतीच्या पावसाने हातचा आलेला तोंडाचा घास हिरावून नेला. पावसामुळे बळीराजाचे पीक शेतातच सडले. शासनानेही त्यावर कहरच केला. वरून शेतमालाचे भाव पाडले. त्यावर राजकारण्याची राजकीय कुरघोडी होत आहे. यात मात्र बळीराजाला देशोधडीला लावत आहे. सद्या पेरणीच्या दिवसामुळे महागाईत कृत्रिम बि-बियाण्याची टंचाई निर्माण केली आहे. पीक कर्ज मिळत नसल्यानेही बळीराजा अडचणीत आला आहे.







राज्यातील शेतकरी दिवसेंदिवस विपन्नावस्थेत जात आसतांना राज्यातील सत्ताधीश आणि विरोधक राजकिय कुरघोडयात मग्न आहेत. मग्न आहे. गेल्या खरीप हंगामात अती पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले. सोयाबीन पीक अर्धे अधिक खराब झाले. तुटपुंजी मदत काही शेतकऱ्यांना देवुन सरकारने बोळवन केली. विमा कंपन्याकडुन पून्हा घोर निराशा झाली केवळ दहा ते बारा टक्केच शेतकऱ्यांना मदत देवुन कंपन्यानी हात वर केले. हया बाबतीत आढावा घेण्यासाठी सरकारकडे वेळच नाही. तुर पीक हातातून गेले. एकरी एक पोते उत्पादन होत आहे. आशा परिस्थितीत शेतकऱ्यांचा लावलेला खर्च सुध्दा वसुल झाला नाही. गेल्या मार्च २०१८ पासुन कोटेशन भरलेल्या शेतकऱ्यांना विज जोडणी नाही. जवळच्याच तेलंगणा सरकार ने शेतकऱ्यांना चोविस तास मोफत विज मोफत देत आहेत.

निवडणुकीत शेतकऱ्यांना मोफत विज देण्याचे मान्य केले. मग महाराष्ट्रात सरकार शेतकऱ्यांकडून सक्तीच्या वसुलीसाठी कनेक्शन कट करीत आहे. अनेक शेतकरी कर्ज माफीपासून वंचित आहेत. मुग गिळून गप्प बसले आहेत. त्यावर अधिवेशनात राजकारणी, आमदार एकमेकांच्या अंगावर जावून भांडण करीत आहेत.

सत्ताधारी एकमेकांचे आमदार - खासदार फोडण्यात मग्न आहेत. राजकारणी फक्त राजकीय कुरघोडी करीत आहेत. शेतकरी देशोधडीला लागला असून राजकारण्याची फक्त स्वार्थासाठी कुरघोडी सुरू आहे.

## मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात-मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत



आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी. मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे.

## उकळी पेन येथे जिकडे-तिकडे घाणच घाण

### ग्रामपंचायतीचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष; जागोजागी कचऱ्याचे ढीग, रोगराईची भीती

● सिटी न्युज ब्युरो @ उकळी पेन ●

उकळी पेन गावात स्वच्छतेचे फलक झळकत असले तरी प्रत्यक्षात गावभर कचऱ्याचे ढीग साचल्याचे चित्र दिसून येत आहे. मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठ, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा साचल्याने दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामपंचायतीकडून स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या पावसाळ्यामुळे साथीच्या





रोगांचा धोका वाढला असताना गावात उलटी, जुलाब यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढल्याची माहिती नागरिकांनी दिली. काही रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने पुढील उपचारासाठी वाशीम येथे जावे लागत असल्याचेही सांगण्यात आले. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, स्वच्छतेबाबत ग्रामपंचायतीला वारंवार लेखी निवेदने देऊनही ठोस कार्यवाही झालेली नाही. निधीअभावी नियमित स्वच्छता करणे शक्य नसल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आल्याची माहितीही नागरिकांनी दिली. दरम्यान, गावातील युवकांनी पुढाकार घेत 'एक रविवार गावासाठी' या उपक्रमांतर्गत स्वयंप्रेरणेने स्वच्छता अभियान सुरू केले आहे.

या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे. गावात तातडीने स्वच्छता मोहीम, जंतुनाशक फवारणी, प्रत्येक चौकात कचराकुंड्या उपलब्ध करून देणे तसेच घंटागाडीची नियमित व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## सागवानसह आडजातीच्या झाडांची सर्रास तस्करी







### वनविभागाच्या दुर्लक्षाने राष्ट्रीय संपत्तीचे लाखो रूपयांचे नुकसान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तालुक्यातील पाळोदी, रूई, गोस्ता, शेंदुरजना (अढाव), रतनवाडी, आमदरी आदी परिसरात जंगलाचे भाग असल्याने वनविभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे सागवान व आडजातीच्या झाडांची कत्तल होऊन लाकडांची सर्रास तस्करीहोत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सविस्तर वृत्त असे की, मानोरा तालुका हा डोंगराळ भागात वसलेला असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपदा संपत्तीने तालुका वेढलेला आहे. तालुक्यात रूई, गोस्ता, पाळोदी, रतनवाडी, शेंदुरजना (अढाव), आमदरी आदी परिसरात सागवान वृक्ष मोठ्या प्रमाणात आहे. येथील लाकडांचा दर्जा उच्च दर्जाचा असल्याने जिल्ह्याबाहेर लाकडाची मागणी होते. परंतु वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना हाताशी धरून अर्थपूर्ण व्यवहाराच्या माध्यमाने चोरट्या मार्गाने लाकडांची तस्करी करणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने वन विभागाची जंगम मालमत्ता वृक्ष कटाईमुळे दिवसेंदिवस कमी होत आहे.

मानोरा तालुक्यात पाळोदी, शेंदुरजना (अढाव) येथे डेपोची चौकी आहे मात्र वनविभागाचे अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने रात्रीच्या वेळी लाकडांची चोरट्या मार्गाने चोरी करणाऱ्यांना अभय मिळतो तसेच लाकडाची तस्करी करणारे व संबंधित यांची मर्जी असून आर्थिक देवाण घेवाणीचे समजते.

वनविभागाच्या भोंगळ कारभारामुळे राष्ट्रीय वनसंपत्तीचे लाखो रूपयाचे नुकसान होत असून पर्यावरणावर सुध्दा याचा परिणाम होत आहे. शासनाने लाखो रूपय खर्च करून जंगलात पाणलोट, वृक्ष लावगड असे विविध कार्यक्रम राबवून तळे खदुन जलसाठा जमिनीत निर्माण होऊन झाडे जगविण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करतो. सेच त्यावर पाहणी करण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची मासिक वेतनाधर लाखो रूपये खर्च करून झाडांना जगवितात परंतु वरिष्ठांचे दुर्लक्ष व संबंधित मुख्यालयी राहत नसल्याने मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय संपत्तीची हानी होते. वरिष्ठांनी गांभीर्याने या सर्व प्रकारावर लक्ष केंद्रीत करून निसर्ग व पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता संबंधितांना सक्ती करण्याची मागणी निसर्ग प्रेमी नागरिकांच्या वतीने होत आहे.

## नाईलाजाने करावा लागतो विनातिकीट प्रवास

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील रेल्वेस्थानकावरुन गत काही महिण्यांपासुन लांब पल्याच्या गाड्या सुरू झाल्या आहेत. तथापी रेलवेने ये-जा करणाऱ्यां प्रवाशांची संख्या वाढली आहे. मात्र रेल्वेस्थानकावर तिकीट काढण्यासाठी एकच खिडकी असल्याने अनेक प्रवाशांना रांगेत लागल्यानंतर गाडी येईपर्यंत तिकीटच मिळत नसल्याने नाईलाजाने अनेक प्रवाशांना विनातिकीट प्रवास करावा लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

पूर्वी नॅरोगेज असलेल्या पूर्णा - अकोला मार्गाचे ब्रॉडगेज मध्ये रुपांतर झाल्यानंतर बऱ्याच रेल्वेगाड्या या मार्गावर सुरू झाल्या आहेत. गत काही महिण्यांपासून लांब पल्याच्या रेल्वे गाड्या या मार्गावर सुरू झाल्यामुळे



वाशीम जिल्ह्यातील प्रवाशांना विविध ठिकाणी प्रवास करणे सोयीचे झाले आहे. या मार्गावर अकोला, तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी सकाळी दहा वाजेदरम्यान रेल्वे गाड्या असल्यामुळे अकोला तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी शेकडो प्रवासी रेल्वेस्थानकावर गर्दी करतात. रेल्वे येण्याच्या काही कालावधी आधी रेल्वेची तिकीट विक्री सुरू होते. आणि प्रवाशांची संख्या जास्त असल्याने काही प्रवाशांनाच रांगेत लागल्यानंतर तिकीट मिळते. रांगेत असतांना रेल्वेगाडीचे आगमन झाल्यानंतर अनेक प्रवासी रेल्वे तिकीट खरेदीच्या रांगेतून तिकीट न काढताच रेल्वेत चढतात. तिकीट न मिळाल्याने नाईलाजाने त्यांना विनातिकीट प्रवास करावा लागतो. यामुळे रेल्वे प्रशासनाचे मोठे नुकसान होत आहे.

तर विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाईलाजाने तिकीट कलेक्टरच्या कारवाईला सामोरे जावे लागत आहे. या रेल्वेस्थानकावर एकच तिकीट खिडकी असल्याने वाढलेल्या प्रवाशांची संख्या पाहता व प्रवाशांची होणारी अडचण दुर करण्यासाठी रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य नितीन पगार, व्यापारी मंडळाचे जुगलकिशोर कोठारी, व विविध सामाजिक संघटनांनी अनेक वेळा संबंधितांकडे मागणी केली आहे. मात्र अद्यापही या मागणीची रेल्वे विभागाने दखल न घेतल्याने रेल्वे स्थानकावर एकाच खिडकीतून आरक्षित तथा इतर तिकीटांची खरेदी करावी लागत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सामान्य रुग्णालयातील समस्यांचे तात्काळ निवारण करा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन- ॲड. अमोल अंधारे

प्रतिनिधी ७जुलै

**खामगाव:** येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील विविध प्रलंबित प्रश्न आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या असुविधांबाबत शिवसेना खामगाव विधानसभा मतदारसंघाच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक यांना एक सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. रुग्णालयाचा कारभार सुधारण्यात यावा आणि रुग्णांची हेळसांड थांबवावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात प्रामुख्याने खालील ६ महत्त्वाच्या मागण्यांवर लक्ष वेधण्यात आले आहे:

**सोनोग्राफी सुविधा:** रुग्णालयात तात्काळ सोनोग्राफी सुविधा सुरू करण्यात यावी आणि त्यासाठी रेडिओलॉजिस्टची नियुक्ती करण्यात यावी.

**वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती:** अनेकदा वैद्यकीय अधिकारी वेळेवर हजर राहत नसल्याच्या तक्रारी आहेत, त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे.

**रुग्णांची हेळसांड व अकोला रेफर करणे:** रुग्णांवर योग्य उपचार न करता त्यांना थेट अकोला येथे रेफर (रवाना) करण्याची पद्धत थांबवून येथेच योग्य उपचार मिळावेत.



**स्वच्छता:** रुग्णालयाच्या वॉर्डमध्ये नियमित आणि योग्य प्रकारे साफसफाई केली जावी.

**नर्सिंग स्टाफचे वर्तन:** डिलिव्हरी वॉर्डमधील नर्सिंग स्टाफकडून रुग्णांशी आणि त्यांच्या नातेवाईकांशी होणारी उद्धट किंवा गैरवागणूक थांबवण्यात यावी.

सिटी स्कॅन मधील गैरप्रकार थांबवून, सिटी स्कॅन बाबत दर पत्रक लावावे

**मूलभूत सुविधा:** सामान्य रुग्णालयामध्ये ए.सी., पंखे, विद्युत व्यवस्था आणि जनरेटरची योग्य सुविधा करण्यात यावी.

या निवेदनावर शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. अमोल अंधारे, उपजिल्हाप्रमुख संजय अवताडे, गजानन उर्फ पिंटू धोरण, तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शहरप्रमुख चेतन ठोंबरे, युवासेना शहरप्रमुख राहुल कळमकार, महिला आघाडी तालुका प्रमुख संघटक सौ जयश्री देशमुख, कल्पना गायगोळ, पल्लवी पाटील, उपशहर प्रमुख करण उर्फ भाऊ बिडकर, करण छापरवाल जीवन जाधव, विद्यार्थी आघाडी जिल्हा प्रमुख विक्की सरवान, विद्यकीय आघाडी जिल्हा संगटक पियुष चव्हाण, उपतालुका उपतालुका प्रमुख बाळासाहेब पेसोडे, रवी माळवंदे, ज्ञानेश्वर शेगोकार, पंकज अंबारे, कृष्णा वाघ, रुपेश तायडे, रवी माळवदे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

रुग्णालयातील या मूलभूत समस्या लवकरात लवकर सोडवल्या नाहीस, तर आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेला वेग

## ◆ पातुर्डा येथे बीएलओंकडून घरोघरी पडताळणी; नागरिकांनी अचूक माहिती देण्याचे प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी ७ जुलै

**संग्रामपूर:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पातुर्डा येथे सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला वेग आला असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती पडताळण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने करत आहेत. गणना प्रपत्र भरून घेण्यासह पात्र मतदारांची माहिती अचूकपणे नोंदविण्यावर भर दिला जात आहे.

जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकारी विविध भागांना भेटी देऊन मोहिमेचा आढावा घेत असून आवश्यक त्या सूचना देत आहेत.



मोहिमेदरम्यान बीएलओ नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेत आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देत अचूक माहिती द्यावी तसेच प्रपत्रातील माहितीची खातरजमा करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदार यादी जितकी अचूक आणि अद्ययावत, तितकी लोकशाही अधिक सक्षम होते. त्यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत प्रत्येक पात्र मतदाराने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे.

ज्या नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने माहिती सादर करावयाची आहे, त्यांच्यासाठी ईसीआयनेट (ECINET) ॲप तसेच https: //voters.eci.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या माध्यमातूनही गणना प्रपत्र भरता येत असून आवश्यकतेनुसार संबंधित बीएलओ किंवा मतदार नोंदणी कार्यालयाकडून मार्गदर्शन मिळू शकते.

अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह मतदार यादी तयार करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची असल्याने प्रत्येक पात्र मतदाराने त्यात सक्रिय सहभाग नोंदवून लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# माटरगाव- निंबी रस्त्याची दुरुस्ती करा- मनसेची मागणी

प्रतिनिधी ७ जुलै

**शेगाव:** तालुक्यातील निंबी गावाकडे माटरगाव मार्गावरून जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून, रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी तसेच मुख्य रस्त्यावरील त्रिफुली येथे स्पीड ब्रेकर बसविण्यात यावा, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शेगाव तालुक्याच्या वतीने उपविभागीय जिल्हा परिषद बांधकाम विभाग, खामगाव येथे निवेदन देण्यात आले.

मनसे बुलढाणा जिल्हाध्यक्ष अमितबापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, निंबी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सुरू असलेल्या संरक्षण भिंतीच्या कामामुळे रस्त्याची दुरवस्था अधिकच वाढली आहे. अलीकडील पावसामुळे संपूर्ण रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचल्याने दुचाकी, चारचाकी तसेच अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वाहनांची ये-जा जवळपास अशक्य झाली आहे. अनेक दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटना घडल्या असून काहींना दुखापतही झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.तसेच मुख्य रस्त्यावरून निंबी गावाकडे वळणाऱ्या त्रिफुलीवर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने त्या ठिकाणी अपघाताची शक्यता कायम आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी तात्काळ स्पीड ब्रेकर बसविण्याचीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.



निवेदन सादर करताना मनसे शेगाव तालुकाध्यक्ष नितीश भावरकर, तालुका उपाध्यक्ष श्रीराम बेद्रे, निंबी शाखाध्यक्ष भगवान नीलजे, विभाग प्रमुख कृष्णा माळी, शहराध्यक्ष परमेश्वर लाहूडकर, रानू शुक्ला तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था

प्रतिनिधी ७ जुलै

**मलकापूर :** ठिकठिकाणी पडलेले खड्डे आणि त्याकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळे संतप्त झालेल्या प्रहार संघटनेने आज ६ जुलै रोजी नगर परिषद प्रशासनाविरोधात अनोखे आंदोलन करीत प्रहारचे जिल्हा उपप्रमुख अजय टप यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला 'बेशरम'चे झाड देवून प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध नोंदविला.

शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. याबाबत अजय टप यांनी ३० जून रोजी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने सर्व रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची मागणी केली होती. त्यानंतर १ जुलैपासून नगर परिषद प्रशासनाने काही मोजक्या ठिकाणी मुरूम, खडी व चुरी टाकून खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले. मात्र हे काम केवळ ठराविक भागापुरतेच मर्यादित राहिल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



शहरातील अनेक मुख्य व अंतर्गत रस्ते आजही खड्ड्यांनी व्यापलेले असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नगर परिषद प्रशासनाकडून काही भागांनाच प्राधान्य देत उर्वरित भागांवर अन्यायकारक पध्दतीने दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप अजय टप यांनी केला.

दरम्यान, मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी नगर परिषद कार्यालयात गेले असता मुख्याधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले. यानंतर संतप्त झालेल्या अजय टप व प्रहारचे शहर उपाध्यक्ष बलराम बावस्कर यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला 'बेशरम'चे झाड देवून प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील नागरिक खड्ड्यांमुळे हैराण असताना नगर परिषद प्रशासनाला त्याचे कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. तातडीने सर्व रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यास प्रहारच्या वतीने आणखी तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# रविदास भवन नवनिर्मिती व संरक्षण भिंत साठी ना. संजय सावकारे यांना मलकापूर चर्मकार समाजाच्या वतीने निवेदन

प्रतिनिधी ७ जुलै

**मलकापुर:** मलकापुर शहरातील बुलढाणा रोड वरील मकसूद कॉलनीतील संत रविदास महाराज सांस्कृतिक भवनाचे बांधकाम निर्जीव झालेले आहे व पावसाळ्यात त्या ठिकाणी पुराचे पाणी येते त्यासाठी संरक्षण भिंत व सभागृहासाठी नवीन इमारत बांधण्यासाठी आपल्या स्थानिक विकास निधी मधून निधी देण्यात यावा याकरिता त्यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देतेवेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा नेते माजी नगरसेवक रवींद्र गव्हाळे, संस्थेचे अध्यक्ष वसंत शेगोकार, उपाध्यक्ष पांडुरंग चिम, दिनकर दांडगे, शांताराम घुले, मेजर अशोक शकोकार, मनोज भोंडेकर यांच्यासह संस्थेचे सभासद व चर्मकार बांधव उपस्थित होते.



# बैलांची कोंबून वाहतूक, गुन्हा दाखल

प्रतिनिधी ७ जुलै

**नांदुरा:** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरीलमलकापूर बायपासवर नांदुरा पोलिसांनी पहाटे नाकाबंदीदरम्यान बैलांची कोंबून वाहतूक करणाऱ्यावर कारवाई केली. या कारवाईत चार बैल आणि मालवाहू वाहन असा सुमारे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दानिश सैय्यद जहीर सैय्यद (२४, रा. काजीपुरा, मुक्ताईनगर, जि. जळगाव) याच्याविरुद्ध नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, पहाटे ४:१५ वाजता एमएच-०६-बीजी-४१२५ क्रमांकाचे मालवाहू वाहन तपासणीसाठी थांबविले असता, त्यामध्ये चार बैलांची अपुऱ्या जागेत कोंबून वाहतूक होत असल्याचे आढळले. काही बैलांच्या अंगावर जखमा असल्याचेही निदर्शनास आले. चौकशीत बैलांच्या मालकीची आवश्यक कागदपत्रे तसेच वाहन चालविण्याचा वैध परवाना नसल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी चार बैल (अंदाजे किंमत १ लाख रुपये) आणि मालवाहू वाहन (अंदाजे किंमत ५ लाख रुपये) जप्त केली. पोलिस अंमलदार अनिल नथ्थू धिरबस्सी यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, प्राण्यांना क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एसटी बससेवा सुधारण्यासाठी परिवहन मंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी ७ जुलै

**सिंदखेडराजा :** तालुक्यातील वाढत्या लोकसंख्येचा व विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्राचा विचार करून ग्रामीण भागासाठी नवीन व पुरेशा एसटी बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्याचे परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

उपनगराध्यक्ष सौ. दिपाली योगेश म्हस्के आणि नगरसेवक तथा गटनेते ॲड. संदीप सखाराम मेहेत्रे यांनी दि. २ जुलै रोजी परिवहन मंत्र्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन हे निवेदन सादर केले. निवेदनात तालुक्यातील वाहतूक व्यवस्थेवर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सिंदखेडराजा तालुका हा ११४ गावांचा विस्तीर्ण परिसर असून अनेक गावे मुख्य केंद्रापासून ३० ते ५० किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामांसाठी मोठ्या प्रमाणात एसटी बससेवेवर अवलंबून राहावे लागते.मात्र, सध्या उपलब्ध असलेल्या बसेसची संख्या अपुरी असून अनेक बसेसची स्थिती अत्यंत खराब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# वाघाच्या हल्ल्यात युवक गंभीर; गायी, वासरांचा फडशा

प्रतिनिधी ७ जुलै

**सोनाळा:** अंबाबरवा अभयारण्याच्या बफर क्षेत्रात जटाशंकर परिसर आहे. येथे लगतच्या हडियामाल येथील गुरे-ढोरे चराईसाठी गेलेल्या एका २६ वर्षीय आदिवासी युवक वाघाच्या - हल्ल्यात गंभीर झाल्याची घटना सोमवार ६ जुलैच्या दुपारी ३ वाजेच्या दरम्यान उघडकीस आली. यात गायी, वासरांसमवेत ५ पाळीव जनावरांचा वाघाने फडशा पाडला आहे. यामूळे आदिवासी गावात एकच दहशत पसरली आहे.

वाघाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या आदिवासी युवकाचे नाव अनिल अर्जुन सोळंके असे आहे. घटनेची माहिती होताच परिसरात गस्तीवर असलेल्या वन्यजीव विभागाच्या वनपाल देव बेराळ, वनपाल राठोड व गावातील जयमाल भायडया यांनी शासकीय वाहनाने सोनाळा प्रा. आ. केंद्रात दाखल केले.



प्राथनिक उपचारानंतर जखमीला १०८ रुग्णवाहिकेतून शेगाव सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. तेथून अकोला येथे रेफर करण्यात आले आहे. वाघाने चेहऱ्यावर, पाठीवर, हातावर, छातीवर, पोटावर पंजे मारून अनिल सोळंके याला रक्त बंबाळ केले तत्पूर्वी २ गायी ३ वासरे याचा वाघाने फडशा पाडल्याचे जखमी सांगत आहे. घटनास्थळावरून जखमीने

याबाबत माहिती गावात मोबाईल वरून दिली. त्यामुळे गावकरी व वन्यजीव विभागाचे कर्मचारी घटनास्थळाकडे धावले. जयशंकर हे सुप्रसिध्द तिर्थाटन व धबधबा परिसर आहे. हा भाग सोनबर्डी बीटमध्ये समाविष्ठ आहे. कंपार्टनेट नं ३६३ मध्ये ही घटना घडली. याबाबत सोनाळा वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात माहिती नोंदविण्यात आली आहे वरिष्ठ कार्यालयाकडे याची माहिती तातडीने देण्यात आली आहे.

# पावसाळ्यात घरकुल लाभार्थ्यांचे हाल ; जिल्ह्यात 97 ,772 घरांचे काम अपूर्ण !

## लाभार्थ्यांचे हप्ते रखडल्याने बांधकामांचा वेग मंदावला!

प्रतिनिधी ७ जुलै

**खामगाव:** पावसाळा सुरू झाल्याने घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) २ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात मंजूर झालेल्या घरकुलांपैकी तब्बल ९७हजार ७७२ घरे अद्याप बांधकामाच्या विविध टप्प्यांत आहेत. शासनाकडून वेळेत हप्ते न मिळाल्याने अनेक लाभार्थ्यांना बांधकाम अर्धवट ठेवावे लागले असून, पावसाळ्यात त्यांच्यावर जुन्या, जीर्ण किंवा तात्पुरत्या घरातच राहण्याची वेळ आली आहे.

जिल्ह्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) २ अंतर्गत १ लाख ५ हजार १८० घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी १ लाख ३ हजार ४७१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे; मात्र प्रत्यक्षात केवळ ५ हजार ६९९ घरे पूर्ण झाली आहेत. उर्वरित घरांचे बांधकाम निधीअभावी किंवा प्रलंबित हप्त्यांमुळे रखडले आहे. अनेक लाभार्थ्यांनी पहिला किंवा दुसरा हप्ता मिळाल्यानंतर स्वतःच्या आर्थिक क्षमतेनुसार बांधकाम सुरू केले. मात्र, पुढील हप्ते वेळेत न मिळाल्याने काम थांबले आहे. त्यातच पावसाळा सुरू झाल्याने अर्धवट बांधकामाचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. काही ठिकाणी भिंती उभारून काम बंद पडले आहे, तर काही ठिकाणी छप्पर नसल्याने बांधकाम पावसाच्या पाण्यामुळे खराब होत असल्याची स्थिती आहे. दरम्यान, बांधकाम साहित्याच्या वाढलेल्या किमती आणि मजुरीच्या खर्चामुळेही लाभार्थ्यांवरील आर्थिक ताण वाढला आहे. प्रशासनाने प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करून रखडलेली बांधकामे पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.




**जिल्ह्यात १ लाखांवर घरकुलांना मंजुरी !**


जिल्ह्यासाठी १,०५,१८० घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी १,०३,४७१ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. मंजुरीचे प्रमाण ९८.४ टक्के असले, तरी आतापर्यंत केवळ ५,६९९ घरे पूर्ण झाली आहेत. तब्बल ९७,७७२ घरकुले अद्याप प्रगतीपथावर असल्याने हजारो लाभार्थ्यांना पक्क्या घरासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

**पावसाळ्याने वाढल्या लाभार्थ्यांच्या अडचणी!**

अपूर्ण घरकुलांचे बांधकाम पावसामुळे ठप्प होत असून, बांधकाम साहित्याचे नुकसान, भिंतींना ओलावा आणि खर्चात वाढ अशा समस्यांना लाभार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे. वेळेत हप्ते मिळाल्यास घरकुलाच्या कामांना वेग देणे शक्य होईल, अशी अपेक्षा लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.

**एखाद्या व्यक्तीचे यश त्याच्या संपत्तीत नसते, तर त्याने घडवलेल्या माणसांमध्ये असते. सेवा, साहित्य, शिक्षण आणि संस्कार यांच्या माध्यमातून अनेकांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणे, हेच माझे खरे यश.**

अमृतमहोत्सवी वर्ष 75 वा वाढदिवस





**"सेवा, त्याग आणि शिक्षणाचा वसा जपत हजारो मुलांच्या भविष्याला नवी दिशा देणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व."**

- **अध्यक्ष**, बहुजन विकास मंडळ, रविनगर, कौलखेड, अकोला
- **अध्यक्ष**, क्रांतीज्योती मराठी उच्च प्राथमिक शाळा, गजानन नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला
- **सभासद**, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, मुंबई.

# मा. श्री. भास्करराव जाधव



यांना **अमृतमहोत्सवी** दिनानिमित्त

## मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -

- आयु. ॲड. मनिषा भास्करराव जाधव (सचिव, बहुजन विकास मंडळ अकोला)
- आयु. दिलीप दौलतराव जाधव (संस्थापक अध्यक्ष, बहुजन संघर्ष सेना, बुलडाणा)
- आयु. सौ. ज्योती दिलीपराव जाधव
- आयु. मिलिंद भास्करराव जाधव (उपअभियंता, जिल्हा परिषद, अकोला)
- आयु. डॉ. सौ. मंजुषा मिलिंद जाधव (उपाध्यक्ष, बहुजन विकास मंडळ अकोला)
- आयु. कुमारी प्रणिती मिलिंद जाधव.
- आयु. कु. देवश्री दिलीपराव जाधव (कवयित्री व गायिका)
- आयु. दीपरत्न दिलीपराव जाधव
- देवता भास्कर इन्फ्राटेक कंपनी
- देवता भास्कर इंडस्ट्रीज प्रा. लि.
- देवता भास्कर सोलर पॉवर कंपनी.
- देवता भास्कर फिल्म.
- अर्चना पालवे (मुख्याध्यापिका, क्रांती ज्योती मराठी उच्च प्राथमिक शाळा)
- अमोल मडावी (सहयाक, क्रांती ज्योती मराठी उच्च प्राथमिक शाळा)

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135